www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ अंक : ३४ रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# आपत्तीग्रस्त तालुक्यांसाठी विशेष मदत पॅकेज, सवलती लागू; 251 तालुके पूर्णत: तर 31 तालुके अंशत: आपत्तीग्रस्त म्हणून घोषित

## शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

## आपत्तीग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृश परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती; शासन निर्णय निर्गमित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्यात जून ते सप्टेंबर 2025 या कालावधीत अतिवृष्टी, पूर आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने 251 तालुके पूर्णतः तर 31 तालुके अंशतः आपत्तीग्रस्त/अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करून आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज आणि विविध सवलती लागू केल्या आहेत. तसेच आपद्ग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृश परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन वाहून जाणे, घरांची पडझड, जनावरांची हानी आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. या सर्व आपद्ग्रस्तांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून राज्य शासनाने हे विशेष पॅकेज लागू केले आहे. या विशेष पॅकेजमुळे बाधित पिके, शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

जून ते सप्टेंबर 2025 या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित 251 पूर्णतः व 31 अंशतः बाधित तालुक्यातील बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करण्यात आले. जून ते ऑगस्ट 2025 या कालावधीत 26.69 लाख हेक्टर तर सप्टेंबर 2025 मध्ये जवळ जवळ 39 लाख हेक्टर अशा सुमारे 65 लाख हेक्टर क्षेत्रावरील शेत पिकांचे नुकसान झाले असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

आर्थिक साहाय्य – आपद्ग्रस्त मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना रुपये चार लाख, अवयव अथवा डोळे निकामी झाल्यास 40 ते 60 टक्के अपंगत्व आल्यास रुपये 74 हजार, 60 टक्के पेक्षा अधिक अपंगत्व आल्यास 2 लाख 50 हजार, जखमी व्यक्ती रूग्णालयात एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी दाखल झाला असल्यास 16 हजार, एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास 5 हजार 400 रुपये.

घरांसाठी मदत – पूर्णतः नष्ट झालेल्या पक्क्या /कच्च्या घरांसाठी- सपाट भागातील प्रती घर रुपये 1 लाख 20 हजार तर डोंगराळ भागातील घरांसाठी 1 लाख 30 हजार, अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी (किमान 15 टक्के) पक्क्या घरांसाठी प्रती घर 6 हजार 500 रुपये, कच्च्या घरांसाठी प्रती घर चार हजार रुपये, प्रती झोपडी आठ हजार रुपये, प्रती गोठा तीन हजार रुपये.

मृत जनावरांसाठी – दुधाळ जनावरांसाठी प्रती जनावर 37 हजार 500 रुपये, ओढकाम करणाऱ्या जनावरासाठी प्रती जनावर 32 हजार रूपये, लहान जनावरासाठी प्रती जनावर 20 हजार रूपये, शेळी मेंढी प्रती जनावर चार हजार रुपये आणि प्रती कोंबडी 100 रुपये.

शेतीपिकांचे नुकसान – प्रति हेक्टर 8 हजार 500 रुपये (तीन हेक्टर मर्यादेत), आश्वासित सिंचनाखालील (बागायत) पिकासाठी प्रती हेक्टर 17 हजार (तीन हेक्टर मर्यादेत), आणि बहुवार्षिक पिकांसाठी प्रती हेक्टर 22 हजार 500 रुपये (तीन हेक्टर मर्यादेत).

शेतजमीन नुकसान – नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमिनीवरील गाळ काढणे प्रती हेक्टर 18 हजार रुपये आणि दरड कोसळणे/ जमीन जमीन खरडणे, खचणे व नदीपात्र प्रवाह बदलल्यामुळे शेतजमीन वाहून जाणे यासाठी केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रती हेक्टर 47 हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

मत्स्य व्यवसाय – मत्स्य व्यावसायिकांना बोटींची दुरुस्ती, जाळी यासाठी बोटींची अंशतः दुरुस्ती सहा हजार रुपये, पूर्णतः नष्ट झालेल्या बोटींसाठी 15 हजार, अंशतः बाधित झालेल्या जाळयांच्या दुरुस्तीसाठी तीन हजार रुपये आणि पूर्णतः नष्ट झालेल्या जाळयांसाठी चार हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

इतर सवलती- नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित शेतकऱ्यांसाठी आणि नागरिकांसाठी सवलती लागू केल्या असून यामध्ये जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस एक वर्षासाठी स्थगिती, तिमाही वीज बिलात माफी, परीक्षा शुल्कात माफी व 10 वी आणि 12 वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी या सवलतींचा समावेश करण्यात आला आहे.या सवलतीबाबत योजनेचे स्वरूप व त्या बाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना/आदेश संबधित प्रशासकीय विभागामार्फत निर्गमित करण्यात येणार आहेत.

कृषी विभाग – या रब्बी हंगामामध्ये शेतकऱ्यांना खते व बियाणे घेण्यासाठी प्रति हेक्टरी 10 हजार प्रमाणे (तीन हेक्टरच्या मर्यादेत) मदत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये



थेटपणे जाईल याबाबत आवश्यक ती कार्यप्रणाली व निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही कृषी विभागाने करावयाची आहे.

पशुसंवर्धन विभाग – मोठे पशुधन, लहान पशुधन व कुक्कुटपक्षी मृत पावलेले आहेत. याबाबत शासन निर्णय 27 मार्च 2023 च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत दिली जाईल. याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावरुन प्रचलित निकषानुसार उपलब्ध असलेल्या उणे प्राधिकरण सुविधेनुसार तातडीने करावी. 27 मार्च 2023 च्या शासन निर्णयाच्या निकषाबाहेरील (वाढीव पशुधन हानी) पशुधन हानीसाठीचे निकष शिथिल करण्यात येऊन जेवढे पशुधनाचे नुकसान झाले आहे त्या सर्व पशुधन हानीबाबत पशुसंवर्धन विभागामार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

मत्स्यव्यवसाय – मच्छीमार जाळी, मत्स्यबीज, मत्स्य बोटींचे नुकसान झालेले आहे याबाबत शासन निर्णय 27 मार्च 2023 च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत देण्यात येणार आहे. 27 मार्च 2023 च्या शासन निर्णयातील निकषाबाहेरील (वाढीव मत्स्यबीज हानी, मच्छिमार जाळी) हानीसाठीचे निकष शिथिल करण्यात येऊन जेवढे मत्स्यबीज हानी व मच्छिमार जाळीचे नुकसानीबाबत मत्स्यव्यवसाय विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

रोजगार हमी योजना विभाग– अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांची शेतजमीन खरडून जाऊन झालेल्या नुकसानीसाठी शासन निर्णय दि.27 मार्च 2023 च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत दिली जाईल. या मदतीव्यतीरिक्त रोजगार हमी योजना विभागामार्फत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी जास्तीत जास्त तीन लाख प्रति हेक्टर या मर्यादित व दोन हेक्टर पर्यंत पाच लाख मदत अनुज्ञेय राहणार आहे. तसेच अतिवृष्टी व पुरामुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरी दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्यक्ष खर्चास किंवा प्रती विहिर कमाल मर्यादा 30 हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती लाभार्थ्यास अनुज्ञेय राहणार आहे. यासाठी रोजगार हमी योजना विभागामार्फत आवश्यक निधीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

पायाभुत सुविधा- अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, ऊर्जा या विभागांतर्गतच्या तातडीच्या व आवश्यक कामांसाठी रुपये 10 हजार कोटीचे विशेष पॅकेज संदर्भात संबंधित विभागाने नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे प्रभावित / घोषित तालुक्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या उपाययोजना खरीप हंगाम 2025 (जून ते ऑक्टोबर) साठी लागू राहतील. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन माहिती प्रणालीद्वारे (एनडीएमआयएस) शासनाने जाहीर केलेल्या मदतीच्या विशेष पॅकेज मधील योजना, उपक्रम / कामांची माहिती केंद्र शासनाच्या एनडीएमआयएस पोर्टलवर भरण्यात येणार आहे.

ई-केवायसी– ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक मध्ये नोंदणी होऊन ॲग्रीस्टकमध्ये ई-केवायसी झाली आहे अशा शेतकऱ्यांची माहिती डीबीटी प्रणालीवर भरलेल्या माहितीशी जुळत असलेल्यांना मदत मिळणे सुलभ व सुकर होण्यासाठी (डीबीटी द्वारे मदत वितरणासाठीच्या आवश्यक) ई-केवायसी प्रक्रियेपासून सूट देण्यात येत आहे.

**अतिवृष्टी व पुरामुळे पूर्णतः बाधित तालुके-**

पालघर :- पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड (चार तालुके)

नाशिक– मालेगाव, निफाड, नांदगाव, सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, चांदवड, येवला ( 12 तालुके)

जळगांव– एरंडोल, पारोळा, धरणगाव, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर (13 तालुके)

अहिल्यानगर– अहिल्यानगर, शेवगाव, कर्जत, पाथर्डी, नेवासा, राहाता, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी, श्रीगोंदा, कोपरगाव ( 11 तालुके)

सोलापूर– उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस, माढा, करमाळा, सांगोला ( 11 तालुके)

सांगली– मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव, कवठेमहांकाळ, विटा, आटपाडी, जत ( नऊ तालुके)

सातारा- कोरेगाव, खटाव, माण ( तीन तालुके)

कोल्हापूर– करवीर, राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड ( पाच तालुके)

छत्रपती संभाजीनगर– छत्रपती संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री (नऊ तालुके)

जालना– बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद ( आठ तालुके)

बीड– बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी ( 11 तालुके)

लातूर – लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुरअनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर ( 10 तालुके)

धाराशिव– धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा ( आठ तालुके)

नांदेड– कंधार, किनवट, मुदखेड, भोकर, अर्धापूर, माहूर, नांदेड, लोहा, मुखेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, हदगाव, हिमायतनगर, उमरी ( 16 तालुके)

परभणी– पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी ( नऊ तालुके)

हिंगोली– हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत ( पाच तालुके)

बुलढाणा– चिखली, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर, मलकापूर, जळगाव जामोद ( 11 तालुके)

अमरावती– अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापूर ( 14 तालुके)

अकोला– अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शी टाकळी ( सात तालुके)

वाशिम– वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा ( सहा तालुके)

यवतमाळ– पुसद, यवतमाळ, बाभूळगाव, मारेगाव, महागाव, उमरखेड, कळंब, घाटंजी, राळेगाव, दारव्हा, आर्णी, नेर, दिग्रस, पांढरकवडा, वणी, झरी जामणी ( 16 तालुके)

वर्धा– वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, कारंजा, आष्टी ( आठ तालुके)

नागपूर– नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड ( १३ तालुके)

भंडारा– साकोली, भंडारा, मोहाडी, तुमसर, पवनी, लाखनी, लाखंदूर ( सात तालुके)

गोंदिया– देवरी ( एक तालुका)

चंद्रपूर- चंद्रपूर, भद्रावती, राजूरा, बल्लारपूर, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रम्हपुरी ( 14 तालुके)

गडचिरोली– गडचिरोली, धानोरा, मूलचेरा, आरमोरी, कुरखेडा, अहेरी, सिरोंचा, भामरागड, एटापली, देसाईगंज (वडसा) (10 तालुके)

अतिवृष्टी व पुरामुळे अंशतः बाधित तालुके-

नाशिक – कळवण, देवळा, इगतपुरी (तीन तालुके)

धुळे – धुळे, साक्री, शिंदखेडा (तीन तालुके)

अहिल्यानगर – पारनेर, संगमनेर, अकोले (तीन तालुके)

पुणे – हवेली, इंदापूर (दोन तालुके)

सांगली – कडेगांव (एक तालुका)

सातारा – सातारा, कराड, पाटण, फलटण, जावळी (पाच तालुके)

कोल्हापूर – कागल, शिरोळ, पन्हाळा (तीन तालुके)

बुलढाणा – नांदुरा, संग्रामपूर (दोन तालुके)

गोंदिया – तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, मोरअर्जुनी, सालेकसा, सडक अर्जुनी, आमगाव (सात तालुके)

गडचिरोली – चारमोशी, कोरची (दोन तालुके)

अंशतः बाधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष बाधित मंडळ सवलतीस पात्र असतील.

# कामगार योजनांचा लाभ उठविणाऱ्या बनावट लाभार्थी व दलालावर कारवाई करा

## काँग्रेसची सहायक कामगार आयुक्त यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**नेवासा प्रतिनिधी लखन वाल्हेकर**

कामगार कल्याण योजनानांचा लाभ घेणाऱ्या बनावट लाभार्थीवर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसकडून अहिल्यानगर येथील सहायक कामगार आयुक्त यांच्याकडे करण्यात आली.

कामगार विभागामार्फत बांधकाम कामगारांसाठी विविध योजना राबविण्यात येतात परंतु त्याचा लाभ खऱ्या कामगारांना मिळण्याऐवजी बनावट लाभार्थीच जास्त उठवितात.तर अनेक खरे कामगार या योजनापासून वंचित आहे.अहिल्यानगर जिल्ह्यात या योजनाचा लाभ मिळवून देण्यासाठी दलालांचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे यावेळी निदर्शनास आणून दिले.या दलाल रॅकेटकडून खोटे प्रमाणपत्र, कागदपत्रे, खोटे शिक्के तयार करून देण्यात येत असल्याचे समोर येत आहे.तसेच या बनावट लाभार्थ्यांच्या मुलांना



देखील लाभ मिळवून देण्यासाठी त्यांची खोटी प्रमाणपत्रे तयार करून त्याचा लाभ उठविण्याचा प्रकार उघकीस येत आहे. या दलाला कडून बोगस कामगार नोंदणीसाठी प्रत्येकी दोन हजाराच्यावर नोंदणी फी घेण्यात येत आहे तर दरवर्षी नूतनी करणासाठी हे दलाल मोठी रक्कम उकळताना दिसतात.याशिवाय कामगार किट, गृहउपोयागी साहित्य, यांच्या मध्ये देखील बनावट कामगारांनी बोगस लाभ उठविण्याचा मोठा घोटाळा झाल्याचा संशय आहे. अहिल्यानगरमध्ये दिवसेंदिवस या दलालांची दुकानदारी वाढताच चालली असल्याचे यावेळी निदर्शनास आणून दिले. तर या दलालावर तसेच कामगार कल्याण योजनाचा लाभ घेणाऱ्या बनावट लाभार्थीवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी काँग्रेस पक्षांकडून करण्यात आली. या निवेदनावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, छावाचे प्रदेश अध्यक्ष रावसाहेब काळे, बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण,शहराध्यक्ष अजूम पटेल, सुमित पटारे, आदिसह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

> **कामगार विभागात दलालांचे मोठे रॅकेट निर्माण झाले असून या रॅकेटचा कामगार कार्यालयातील अधिकाऱ्यांशी थेट आर्थिक संबंध असल्यामुळे दलालांचा सुळसुळाट वाढला आहे या दलालामुळे बोगस कामगार नोंदणी प्रमाण वाढल्याने खरे कामगार लाभापासून वंचित राहिले त्यांना न्याय मिळाला पाहिजे**
>
> **- संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी**

# रायगड जिल्हास्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेतून खेळाडूंची विभागीय पातळीकरिता निवड

**दैनिक युवक आधार**

**रायगड (प्रतिनिधी) –**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धा दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर येथे उत्साहात पार पडली.

स्पर्धेचे उद्घाटन सेंट मेरीज जे. एन. पी. स्कूल, उरण चे मुख्याध्यापक श्री. राजेश अल्फान्स यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेचे विशेष आकर्षण वाढले. या स्पर्धेतून रायगड जिल्ह्यातील अनेक प्रतिभावान खेळाडूंची विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत श्रीनारायणगुरु इंटरनॅशनल स्कूल, उलवे आणि सेंट मेरीज जे. एन. पी. स्कूल, उरण या शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



**१४ वर्षाखालील गट :**

मुलांमध्ये – दिव्यांश देवधर, मोहमद ममझार, प्रतीक बोरसे, प्रतीक सुराणा, अतुल चौहान (सर्व – श्रीनारायणगुरु इंटरनॅशनल स्कूल)

मुलींमध्ये – रिया ननावरे, प्रतिक्षा पुरतगेरी, मनस्वी शेळके, मानवी बोहरा, लावण्या पाटील (सर्व – श्रीनारायणगुरु इंटरनॅशनल स्कूल)

**१७ वर्षाखालील गट :**

मुलांमध्ये – यश कोडग, अनुज जाधव, प्रथम कारंडे (श्रीनारायणगुरु इंटरनॅशनल स्कूल), मोक्ष म्हात्रे, जय म्हात्रे (सेंट मेरीज जे. एन. पी. स्कूल)

मुलींमध्ये – सृष्टी सुळे, किमया ठाकूर, साची कासुकर, नियती मांढडकर (सेंट मेरीज जे. एन. पी. स्कूल), स्वरा शेळके (श्रीनारायणगुरु इंटरनॅशनल स्कूल)

स्पर्धेचे तांत्रिक मार्गदर्शन प्रतिक्षा शेरकर (राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस खेळाडू) यांनी केले, तर पंच म्हणून विशाल खुटवड, शैलेश पाटील, काजल मंडल, हर्षद चंदनशिवे व मयूर निघोट यांनी कार्यभार सांभाळला.

सर्व विजेत्या व निवड झालेल्या खेळाडूंना रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, रायगड जिल्हा क्रीडा विकास अधिकारी देविदास पाटील, तसेच रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या अध्यक्षा व मा. उपमहापौर सौ. सीता पाटील, कार्याध्यक्ष पंकज भगत, सचिव स्वप्निल वारंगे व क्रीडा समन्वयक समीर रेवाळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्रीवर्धन किनारपट्टीला ‘ब्ल्यू फ्लॅग पायलट’चा आंतरराष्ट्रीय सन्मान

## महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवा जागतिक दर्जा !

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी – अनिकेत मोहित**

महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण! राज्यातील पाच समुद्रकिनाऱ्यांना ‘ब्ल्यू फ्लॅग पायलट’ हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय दर्जा प्राप्त झाला आहे. या मानांकनामध्ये रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन आणि नागाव किनारा, पालघर जिल्ह्यातील पर्णका (डहाणू), तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर आणि लाडघर किनाऱ्यांचा समावेश आहे.




‘ब्ल्यू फ्लॅग पायलट’ हा दर्जा म्हणजे किनाऱ्याच्या स्वच्छता, सुरक्षितता, पर्यावरणीय शाश्वतता आणि दर्जेदार सुविधा यांचे प्रमाणपत्र. जगभरातील निवडक आणि निकष पूर्ण करणाऱ्या समुद्रकिनाऱ्यांनाच हा सन्मान दिला जातो. या ध्वजाचा अर्थ असा की संबंधित किनारा हा पर्यटकांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि जागतिक निकषांनुसार आदर्श आहे.

ही घोषणा ‘ब्ल्यू फ्लॅग इंडिया’ या संस्थेमार्फत करण्यात आली असून, महाराष्ट्रातील किनारपट्टी विकासाच्या दृष्टीने हा मोठा टप्पा मानला जात आहे. ‘पायलट’ दर्जा मिळाल्यानंतर आता हे किनारे ‘ब्ल्यू फ्लॅग सर्टिफाइड बीचेस’ या अंतिम यादीसाठी पात्र ठरले आहेत.

राज्य शासनाच्या पर्यटन व पर्यावरणपूरक धोरणांमुळे, तसेच स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा यशाचा मान महाराष्ट्राला मिळाला आहे. किनारपट्टी भागात स्वच्छता मोहिमा, सांडपाणी व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त उपक्रम, वॉचटॉवर आणि सुरक्षितता उपाययोजना यामुळे हे किनारे आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळखले जाऊ लागले आहेत.

या सन्मानामुळे आगामी काळात श्रीवर्धन आणि इतर किनारपट्ट्यांवर पर्यटनवाढ, जागतिक दर्जाच्या सुविधा आणि स्थानिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. महाराष्ट्राने पर्यावरणस्नेही आणि शाश्वत पर्यटनाच्या दिशेने टाकलेले हे एक प्रेरणादायी पाऊल असल्याचे मत पर्यटन तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

श्रीवर्धनसाठी हा सन्मान केवळ गौरव नव्हे, तर निसर्ग, संस्कृती आणि पर्यावरण यांचा समतोल राखत विकास करण्याचा एक आदर्श नमुना ठरेल — अशी सर्वसामान्यांकडून भावना व्यक्त केली जात आहे.

# नांदेड येथिल महात्मा गांधी स्मारकासमोरील सद् भावना

## सत्याग्रहात जयजवान अभियानासह मुखेड काँग्रेस कमिटी सामील




**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड महात्मा गांधी स्मारकासमोरील रायबरेली येथील दलीत युवक हरी ओम यांच्या मॉब लिचिंग हत्या,सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमुर्ती भुषण गवई यांच्या यांच्यावरील हल्ला,सोनम वांगचुंग यांची अटक या सर्व घटनेच्या विरोधात नांदेड येथे जय जवान अभियानाने नांदेड येथील महात्मा गांधी स्मारकासमोर सदभावना सत्यागृह आयोजित केला होता.

याप्रसंगी प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड,काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर,युवक काँग्रेस शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले,मागासवर्गीय सेल काँग्रेस शहराध्यक्ष बालाजी साबणे,अल्पसंख्याक काँग्रेस शहराध्यक्ष इमराण पठाण,शहर उपाध्यक्ष बालाजी वाडेकर,शहर उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड,ईरफान मोमीन सह मुखेड मित्र परिवार उपस्थित होता.

# तो असा का बरसतोय !!!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

मे महिन्यापासून बरसणारा पाऊस हा मान्सून किंवा मोसमी पाऊस म्हणून ओळखला जातो. जून ते नोव्हेंबर या काळात पडतो हा पाऊस मान्सून वाऱ्यामुळे पडतो, जो मे महिन्यात अखेरीस अरबी समुद्रातून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पोहोचतो.

यावर्षी मे महिन्यापासून सारखा पाऊस पडत आहे. मे महिन्यात जून जुलै सारखा पाऊस पडणे हे असामान्य हवामान आहे. जे वातावरणातील बदलामुळे घडत आहे.

यावर्षी पावसाने मे महिन्यापासूनच धुवाधार सुरुवात केली ती सप्टेंबर अखेरपर्यंत थांबलीच नाही. सलग कोसळणाऱ्या पावसामुळे मुंबई सह नवी मुंबईत पाणी तुंबले तसेच राज्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. हा पाऊस असा का पडतोय? हा प्रश्न सर्वांनाच भेडसावू लागला आहे.



मे महिन्यात पाच वर्षातील सर्वाधिक पाऊस यावर्षी पडला. सप्टेंबर महिन्यातही पाच वर्षाचा विक्रम मोडीत काढला. मे महिन्यापासून पडणाऱ्या पावसामुळे अनेक वेळा अनेक ठिकाणी पाणी साचण्याच्या घटना होत राहिल्या. यावर्षी पावसाची सर्वाधिक नोंद झाली आहे. वातावरणातील बदलामुळे पावसाचा हा खेळ ही बदलू लागला आहे. एक नाही दोन नाही चार नाही तर चक्क सहा महिन्यापासून पाऊस पडत आहे. यावर्षी शहरातही पावसाचा फटका बसला आहे. कारण वारंवार विस्कळीत होणारी लोकल सेवा, साचणारे पाणी यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

सप्टेंबर अखेरीस आलेल्या पावसाने तर शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान केले आहे. शेती वाहून गेली .कृषी मालाचे उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे बाजार भाव कमी जास्त होऊ लागले आहेत. याला कारण वृक्षतोड, सिमेंटच्या जंगलाची वाढ ,डोंगरच्या डोंगर पोखरले जात आहेत त्यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे. निसर्गाचा समतोलच मुळी बिघडला आहे. त्यामुळे ढग फुटी सदृश्य पावसाच्या घटना वाढत आहेत. तसेच अतिवृष्टीमुळे पूर येऊन कोट्यावधींचे नुकसान होत आहे जीवित हानी होत आहे.

# गुरु गोरक्षनाथ महाराजांच्या मूर्तीची विटंबना प्रकरणी निफाडमध्ये निषेध

## श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्राच्यावतीने पोलिसांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** जुनागढ गिरणार येथील गुरु गोरक्षनाथ महाराजांच्या मूर्तीची अज्ञातांनी विटंबना केल्याच्या घटनेविरोधात निफाड येथील श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्राच्यावतीने तीव्र निषेध नोंदविण्यात आला. या संदर्भात केंद्राच्या प्रतिनिधींनी निफाड पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल पडोळ यांना निवेदन सादर केले.



निवेदनात म्हटले आहे की, गिरणार हे गुरु गोरक्षनाथ महाराज नाथ संप्रदायाचे प्राचीन तीर्थस्थान असून येथे अखंड धुना आणि चरणपादुका आहे. देशभरातून नाथभक्त येथे दर्शनासाठी येतात. मात्र, दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात व्यक्तींनी मंदिराची तोडफोड करून गुरु गोरक्षनाथ महाराजांच्या मूर्तीची विटंबना केली आणि ती जवळील दरीत फेकून दिली. तसेच सेवासाधनांची जागाही उद्ध्वस्त करण्यात आली.

या घटनेमुळे नाथ भक्तांच्या धार्मिक भावना तीव्रतेने दुखावल्या असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदन देताना केंद्राचे प्रमुख वि. दा. व्यवहारे, तसेच सुनील निकम, सुभाष खाटेकर, जगदीश बागडे, संजय सुरळीकर,श्याम जोशी, सौरभ शिंदे, मंगेश डरंगे, अनुरूप कुंभार्डे, मधुकर सोनार, ऋषिकेश ढेपले, पंढरीनाथ सैंद्रे, शुभम मेधने, विश्वनाथ शिरसाठ, राहुल शेळके, श्रीकांत कांदळकर आदी सेवेकरी उपस्थित होते.

# श्रीवर्धन – संस्कृती, सभ्यता आणि संवेदनशीलतेची खरी परीक्षा

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी :-अनिकेत मोहित**

श्रीवर्धनचा इतिहास सर्वांनाच ठाऊक आहे — शांत, सुसंस्कृत, मनमिळावू आणि प्रेमळ माणसांचं गाव. धर्म, भाषा, संस्कृती यांची सुंदर सांगड घालणारे हे ठिकाण देवाने स्वतःच्या हाताने तयार केलेली एक अद्वितीय कलाकृतीच जणू. निसर्गाची ओढ, समुद्राची शांतता, आणि लोकांचा साधेपणा — हेच श्रीवर्धनचे वैशिष्ट्य आहे.

पण दुर्दैवाने, आजच्या या मोबाईलच्या आणि दिखाव्याच्या युगात आपल्या गावातील काही तरुण पिढी मूल्यांपासून दूर जाताना दिसत आहे. ज्या घटना कधी फक्त मोठ्या शहरांत किंवा वृत्तपत्रांच्या हेडलाईनमध्ये वाचायला मिळायच्या, त्या आता आपल्या श्रीवर्धनच्या दारात येऊन ठेपल्या आहेत — हीच खरी शोकांतिका आहे.

अलीकडेच श्रीवर्धन मध्ये अनेक गुन्हेगारी घटना घडत असल्याचे दिसत आहेत. चरस गाजा, खून, चोरी, विनयभंग वडिलोपार्जित व्यवसाय, कमी वयात मिळालेली आर्थिक जबाबदारी आणि त्या बरोबर आलेला अहंकार — यामुळेसुद्धा अशा प्रकारच्या विकृत मानसिकता मुलामध्ये तयार होत आहे अशा घटना केवळ एका व्यक्तीच्या चारित्र्याचा अधःपात नाही, तर आपल्या समाजातील मूल्यांची अधोगती दर्शवणारी आहे.काही घटना अशा पण आहेत या सर्व काळोखातही एक प्रकाशकिरण— तो म्हणजे मुलींनी दाखवलेले धाडस. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, समाजाच्या दबावाला न घाबरणे, आणि स्वतःच्या सन्मानासाठी उभं राहणं — हे खरं धैर्य आहे. अशा महिलांचा आत्मविश्वास आणि साहसच समाजात खरी जागृती निर्माण करू शकतो.दुर्दैवाची बाब म्हणजे, अपराध करणाऱ्याला मिळणारा अप्रत्यक्ष पाठिंबा — काहींची मौन सहमती, तर काहींची उघड पाठराखण आणि सगळ्यात मोठ म्हणजे—दबाव ही आपल्या समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभं करते. जोपर्यंत आपण अन्याय करणाऱ्याला ओळखूनही गप्प बसतो, तोपर्यंत आपण सगळेच त्या अपराधाचे भागीदार ठरतो.श्रीवर्धनसारख्या संस्कारित भूमीवर अशा घटना घडणे हे लाजिरवाणं आहे, पण त्याहून अधिक लाजिरवाणं म्हणजे समाजाने डोळेझाक करणं.आपण विसरू नये — जेव्हा अन्याय आपल्या उंबरठ्यावर येऊन उभा राहतो , तेव्हाच त्याची खरी वेदना समजते, आणि एखाद्या मुलीवर महिलेवर झालेला अन्याय तोच समजून घेऊ शकतो की ज्याच्या पदरी लेक, घरात आई, बहीण, बायको आहे आणि त्यांच्यावर त्याच प्रेम आहे..श्रीवर्धनचा स्वभाव जपण्यासाठी, आपल्या तरुण पिढीला योग्य दिशा देण्यासाठी आणि स्त्रियांना सुरक्षित वातावरण देण्याची जबाबदारी कोण्या विशिष्ट संघटनेची, लोकांची, पक्षाची नाही तर प्रत्येक माणसाने ही जबाबदारी घेतली पाहिजे.

# संविधानिक लोकशाहीच्या उत्सवाचा जागर निवडणूक वर्ष २०२५

## शासन प्रशासन मधील दुवा म्हणजे मतदार; प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडविणारा सेवक कसे निवडाल

इच्छुकांची उमेदवारी निवडताना राजकीय पक्षांची निकक्षे...

नगरपरिषदेच्या प्रभागातून अनेक उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरण्यासाठी इच्छुक आहेत.काही अनुभवी माजी लोकप्रतिनिधी आहे तर कोणी नवं उत्साह मनात ठेवून आपल्या राजकीय इच्छाशक्तीतुंन निवडणूकिला सामोरे जाण्याची तयारी करत आहे . प्रभागातील उमेदवार निवडताना मतदारा पुढे एकच मानसिकता असते ती म्हणजे आपला नगरसेवक आर्थिक सक्षम असावा त्याचा प्रशासन व्यवस्थेवर प्रभाव असावा आणि तो त्यांचा राजकीय लोक वारसा पुढे चालवणारा असावा आणि महत्त्वाचा म्हणजे तो आपल्या समाजाचा ,जातीचा ,धर्माचा असावा असे एक न अनेक विचार मतदारांना स्वाभाविक पणे मतदान करताना विचार करायला लावतात. म्हणजे हा विषय मांडण्याचा उद्देश म्हणजे



वास्तव पहिले असता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक हि स्थानिक पातळीवर आपल्याच लोकांमधून इच्छुक त्या व्यक्तीला मतदान करून लोकप्रतिनिधी बनवते . त्या पात्र व्यक्तीला सामाजिक कामांची आवड असावी नेतृत्व गुण असावं तो कायद्याच्या बाबतीत समज ठेवणारा असावा त्याने जनतेला सोबत घेऊन जनतेच्या सर्वांगीण विकास कार्यातून ते काम आधुनिक व महत्त्वपूर्ण पणे यशस्वी रित्या आखून त्याला नियोजन घडविण्यासाठी पात्र असावा . मूलभूत सुविधा मिळाव्यात त्या उपलब्ध करून भविष्यातील आधुनिक धोरण बनविण्यासाठी त्यांच्या कडे दूरदृष्टी असावी ,आधुनिक जगाच्या गतीतून आपल्या गाव,शहराची हि विकासाची गती संतुलित ठेवण्यात तो जवाबदार असावा .

लोकशाही मध्ये निवडणूकीतून सेवक निवडायचा असतो ज्याला स्वतःच्या उपजीविकेच्या जवाबदारी नंतर प्रशासकीय जवाबदारी पार पाडताना अडचण नसावी . समाजाच्या प्रत्येक घटकाला आधार देणारा असावा ,तो उच्च शिक्षित,पारिवारिक, अध्यात्मिक, कला,संस्कृती, साहित्य, परंपरा जपणारा विनम्र, संवेदनशील मनाचा सेवक असावा. त्याच्या निर्णयावर अभ्यासाचा , दूरदृष्टीचा प्रभाव असावा.तो चारित्र्यवान, बुद्धिजीवी आणि राष्ट्र प्रेमी असावा जनतेच्यातुंन सेवा भावने जनमतांतुंन तो आपली कार्य सक्षमता सिद्ध करणारा निष्कलंक असावा त्या लोकसेवकाला

निवडणूक जिंकल्या नंतर मतभेद न करता समाजातील सर्वांची कामे करदाता म्हणून पूर्ण करून देण्याची मोठया मनाची इच्छा असावी .

लोकप्रतिनिधी पदाची मनात इच्छा ठेवून निवडणूक लढवणाऱ्या त्या उमेदवाराची योग्यता आजच्या वेळी त्याचा समाज ,संपत्ती,प्रभाव,अंकुश पाहून केली जाते. त्यात तो सत्तेतील नेत्यांचा पदाधिकारी असायला हवा ,त्यांची दबाव निर्माण करणारी पार्श्वभूमी असावी त्याच्या कडे संपत्तीच्या जोरावर प्रलोभने देण्यासाठी विकृत, विचित्र युक्त्या असाव्यात आणि त्याच्या कार्याला दुसरा कोणीही विरोध करणारा मोठा गट नसावा ....

**राजकीय पक्ष कसे निवडायचे...**

स्थानिक पातळीवरील त्या पक्षाच राज्य व केंद्रात वर्चस्व असावा , राजकीय पक्ष सत्तेत त्याचा सहभाग असावा ,त्या पक्षाची ध्येय धोरण राष्ट्र प्रेम दर्शीविणारी व स्वाभिमानि देश निष्ठेतून आत्मनिर्भर करणारी असावी.त्या पक्षाचे कार्य पाहताना स्थानिक गरजा पाहता मूलभूत सुविधा, रोजगार व विविध सुविधा देत करदात्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्याच्या कडे मुबलक निधी उपलब्ध व्हावा यासाठी पक्ष पाठिंबा असावा

**मतदारांची आकलन क्षमता**

तेच तेच लोकप्रतिनिधी आणि तीच तीच मानसिकता सातत्याने असणे म्हणजे बेजबाबदार मतदारांची संख्या वाढणे असे होते. त्याला निष्ठावंत कट्टर समर्थक अशा एक ना अनेक शब्दांची जोड लागलेली आपण पाहत असतो . वास्तव पहाता नेतृत्वात बदल झाल्यास , अनेकांना संधी मिळाल्यास वेगवेगळ्या संकल्पनेचा उदय होतो .लोकशाहीतील निरपेक्ष ,निःपक्षपाती नेतृत्वावर त्याच्या कारकिर्दीचा महत्व समजतो आणि त्या लोक भूषणातून ती व्यक्ती सुसंस्कृत पणा ऐतिहासिक निर्णयातून पुढच्या पिढीला प्रेरणा देत असतो .म्हणून मतदारांच या लोकशाही उत्सवाच्या सहभागातील योगदान अनन्यसाधारण आहे.

**उद्देशात्मक कृती ...**

तर चला मतदार राजांनो आपल्या शहरात मतदारांच्या हक्क अधिकारासाठी शासन व प्रशासन यामधील दुआ होण्यासाठी जागरूक कृती करूया ,शहराला विकासाच्या गती कडे नेहण्यासाठी नवं चैतन्य निर्माण करूया राजकीय पक्षांना तुमचे मत ,विचार पठवून देण्यासाठी एक संघटित होऊया .

संपत्ती ,सत्तेच्या जोरावर नव्हे तर पारदर्शक प्रशासन चालवण्यासाठी या संविधानिक लोक उत्सवात आपले मतदान करताना कर्तृत्वाची जाणीव ठेवणाऱ्या त्या नेतृत्वाला संधी देऊ या ...नव्या उमंग ने

आपले शहर युवा नेतृत्वाकडे नव्या पिढीला संधी देऊन भ्रष्टाचार मुक्त व विकासाच्या गतिकडे सुशासन चालवणारे सत्ताधीश सेवक म्हणून बसवूया

या वेळी जनता जनार्दन मालक असून लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या कार्याला पूर्ण करण्यासाठी निवडलेले नेतृत्व हे निमित्त असु द्या आणि अशा नेतृत्वाला लोक भूषण म्हणून सन्मानित करण्यासाठी आपली ही त्यांच्या प्रति असलेली निष्ठा त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी महत्त्वाची बाब असू द्या.

गुन्हेगार पार्श्वभूमीच्या समाजकंटकांना या संविधानिक लोककार्या पासून दूर ठेवा. राजकारण हे समाजकारण म्हणून जगा आणि जगवा

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# खालापूर टोलनाक्याजवळ वाहनचालकांवर दरोडा टाकणारी टोळी पोलिसांच्या ताब्यात

## खालापूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई; तिघेजण गजाआड, 2 फरार आरोपींचा शोध सुरू !

**दैनिक युवक आधार**
**(खालापुर ) संतोष शेवाळे**

मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवेवरील खालापूर टोलनाक्याजवळ वाहन चालकांवर दरोडा टाकणाऱ्या टोळीचा खालापूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या गुन्ह्यातील तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, दोन आरोपी फरार आहेत. अटक आरोपींकडून १५ हजार रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. या धाडसी कारवाईने महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीचे वातावरण कमी झाले आहे.

२९ सप्टेंबरच्या पहाटे साडेचारच्या सुमारास फिर्यादी दिनेश बुधाराम गोदारा आणि त्याचा मित्र सुरेंद्र जांगु हे मुंबईकडे जात असताना खालापूर टोलनाक्याजवळील शौचालयाजवळ थांबले. त्याच वेळी झाडीत दबा धरून बसलेल्या पाच चोरट्यांनी त्यांना जबरदस्तीने ओढत नेऊन मारहाण केली. कोयत्याचा धाक दाखवून त्यांनी दोघांकडून एकूण ३६,५०० रुपये रोख आणि ओळखपत्रे जबरदस्तीने हिसकावून घेतली आणि अंधारात पसार झाले. सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक अशोक जगताप यांनी रात्री




गस्तीदरम्यान घटनास्थळी धाव घेतली. IRB डेल्टा फोर्सचे प्रविण सावंत आणि राजेश शिंदे यांच्या मदतीने हायवेलगत झाडीत संशयास्पद हालचाली दिसताच पोलिसांनी पायपीट करीत सापळा रचला. थोड्याच वेळात चोरट्यांचा गट शेतातून पळताना दिसला. तेव्हा पोलिसांनी अत्यंत शिताफीने पाठलाग करून अनिल अशोक पवार (२५, रा. शिरवली) याला पकडले आणि त्याने चौकशीत त्याच्या साथीदारांची देखील नावे उघड केली. अनिल पवारच्या या कबुलीनंतर किशोर विठ्ठल पवार (२३) आणि गुरुनाथ उर्फ किशोर अशोक पवार (१८) या दोघांनाही पोलिसांनी अटक केली. सर्व आरोपी हे खालापूर तालुक्यातीलच असल्याचे निष्पन्न झाले आहे. उर्वरित दोघे आरोपी फरार असून त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. अटक आरोपींना न्यायालयाने ८ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी दिली असून, त्यांच्या चौकशीत आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी तपासादरम्यान आरोपींकडून लुटलेल्या पैशांपैकी १५,००० रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपींचा पूर्वीचा गुन्हेगारी इतिहासही उघड झाला असून, त्यांनी यापूर्वी अनेक चोरी, दरोड्याचे गुन्हे केल्याचे नोंदीत आढळले आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल आणि पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी कार्यवाही पथकात पो.उप.नि. अशोक जगताप, पोशि अर्जुन मोरे, शिवाजी लोंरे, चालक संदेश कावजी, होमगार्ड गायकवाड यांचा समावेश होता.

**जनतेस पोलिसांचे आवाहन**

वाहनचालकांनी प्रवास करीत असताना एक्सप्रेस हायवेवर केवळ अधिकृत ठिकाणीच वाहन थांबवावे, झाडीझुडपाजवळ किंवा अंधाऱ्या ठिकाणी थांबू नये, संशयास्पद व्यक्ती दिसल्यास ११२ या क्रमांकावर किंवा खालापूर पोलीस ठाणे (०२१९२-२७५०३३) येथे संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक**

पो. उपनिरीक्षक अशोक जगताप: ९३२५१३३९२९

खालापूर पोलीस ठाणे: ०२१९२-२७५०३३

# जिनियस चेस अकॅडमीची विद्यार्थिनी धनश्री ठोंबरे ची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** शहरातील जिनियस चेस अकॅडमीची विद्यार्थिनी धनश्री गणेश ठोंबरे हिने हिंगोली येथे झालेल्या विभागीय शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेमध्ये आपल्या शानदार खेळाचे प्रदर्शन करीत छत्रपती संभाजीनगर विभागीय संघात आपले स्थान पक्के केले आहे. नोव्हेंबर 2025 मध्ये सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेमध्ये ती छत्रपती संभाजीनगर विभागाचे




प्रतिनिधित्व करणार आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे मार्गदर्शक इंटरनॅशनल कोच मयुरेश समिंद्रे सर यांनी अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# तळा तहसील येथे पंचायत समिती सदस्य पदाच्या आरक्षणासाठी विशेष सभेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे**

**तळा :** सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर घेण्याच्या हालचालींना वेग आलेला आहे. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर निवडणूक पूर्व प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. नुकतीच रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती पदाची आरक्षण सोडत जाहीर झाली त्यामध्ये पंचायत समिती तळ्याचे सभापती पद अनुसूचित जमाती ( सर्वसाधारण ) आरक्षित झाले असून जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत




समिती सदस्य पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रमसुद्धा निश्चित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने तळा पंचायत समिती सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडतीकरता सोमवार दिनांक 13 ऑक्टोबर 2025 रोजी 11.00 वा. तळा तहसील येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये तळा तालुक्यातील पंचायत समिती निर्वाचक गण 85 - बोरघरहवेली, 86 - चरईखुर्द, ८७ - रहाटाड, 88 - मांदडगण या निर्वाचक गणाचे सोडत पद्धतीने आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे. याकरिता सर्वपक्षीय नेते कार्यकर्ते नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन तळा तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीमती. स्वाती पाटील यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे रविवारी सह्याद्री वाहिनीवर प्रक्षेपण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध समाजोपयोगी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २४ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या



उत्साहात पार पडला. या साहित्य गौरव सोहळयाचे विशेष प्रक्षेपण रविवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता सह्याद्री मुंबई दूरदर्शन वाहिनीवर होणार आहे.

दिवाळी अंक महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कृतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेले श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. २४ व्या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक अर्थात सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय दिवाळी अंकाचा पुरस्कार 'हंस' या अंकाने पटकाविला तर रायगड जिल्हास्तरीय प्रथम पारितोषिक 'इंद्रधनु' अंकाने पटकाविला. त्याचबरोबर मुख्य बक्षिसांसह सर्वोत्कृष्ट विशेषांक, मुलांसाठी सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक, सर्वोत्कृष्ट कथा, उत्कृष्ट कविता, सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ, सर्वोत्कृष्ट डिजिटल अंक, उत्कृष्ट व्यंगचित्र अशी विविध बक्षिसे या स्पर्धेत नियमितपणे होते. महाराष्ट्रातील किंबहुना देशातील सर्वात मोठी हि दिवाळी अंक स्पर्धा मानली जाते. या स्पर्धेच्या पारितोषिक बक्षिस वितरण सोहळ्याचे प्रक्षेपण सह्याद्री वाहिनीवर होणार आहे.

# फुड मॉल मधे काम करणाऱ्या महिलांसाठी महिला सक्षमीकरण विषय सत्र आयोजित केले

**दैनिक युवक आधार**
**संतोष शेवाळे- (खालापुर)**

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सौ. आंचल दलाल यांच्या आदेशानुसार व खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे सर यांच्या निर्देशनानुसार खोपोली–खालापूर फूड मॉल येथे कार्यरत असलेल्या महिला वर्गासाठी महिला सक्षमीकरण विषयक सत्र आयोजित करण्यात आले.

या सत्रामध्ये महिलांना महत्वाचे काही मुद्दे सांगण्यात आले हनी ट्रॅप, फेसबुक स्कॅम, शिक्षण, सायबर क्राईम, ऑनलाईन होणारी फसवणूक, सोशल मीडिया चा वापर कमीत कमी करणे. डायल ११२ वुमन हेल्प लाईन, सायबर सुरक्षा हेल्प लाइन १०९ या सर्व विविध उपाययोजना कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. खोपोलीतील



तळागाळातील महिलांना अशा मार्गदर्शनामुळे जागरूकता व आत्मनिर्भरतेचा नवा दृष्टिकोन मिळाला.

कार्यक्रमाला खोपोली पोलीस ठाण्याचे अमलदार महिला पोलिस हवलदार संजना चव्हाण व पोलीस कॉस्टेबल सुषमा खाडे तसेच खोपोली पोलीस ठाणे महिला दक्षता समितीच्या सदस्या इशिका शेलार व वर्षा मोरे उपस्थित होत्या.

या उपक्रमासाठी सर्व महिला वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी फुड मॉलचे मुख्य कार्यकारी मोहम्मद रमीझ रजा व अभिजीत लक्ष्मण राऊत यांनी खोपोली पोलीस ठाण्याचे विशेष आभार मानले व यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# दहा ते बारा दिवसापासून घंटागाडीचा पत्ताच नाही...

## महिला वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात नगरपरिषद विषयी रोष

**दैनिक युवक आधार**
**चिखली प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे**

चिखली (बुलढाणा) येथील वार्ड क्रमांक 23 जाफ्राबाद रोड पाण्याच्या टाकीजवळ गेल्या दहा ते बारा दिवसापासून घंटागाडीचा पत्ताच नाही,नगरपरिषदेने याकडे ताबडतोब लक्ष देऊन घंटागाडीची व्यवस्था करावी, घंटागाडी वेळेवरती येत नसल्यामुळे घरामध्येच कचरा साठवून ठेवण्याची वेळ महिलांवरती आली आहे.त्या सडलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधीचा वास मोठ्या प्रमाणात पसरत आहे.दुर्गंधीमुळे मोठ्या प्रमाणात डासाचे प्रमाण होऊन घरातील लहान मुलांना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होत आहे. नगरपरिषद यांनी याची वेळीच



दखल घेऊन घंटागाडीची ताबडतोब व्यवस्था करावी.या वार्डामध्ये घंटागाडी वेळेवर येत नसल्यामुळे नगरपरिषद विषयी महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजीचा सुरू उमटत आहे.जर का घंटागाडी वेळेवर आली नाही तर येथील महिला नगरपरिषद मध्ये येऊन जाब विचारल्याशिवाय राहणार नाही याची दक्षता नगरपरिषदेने घ्यावी. नगरपरिषदेने याकडे लक्ष देऊन ताबडतोब घंटागाडीची व्यवस्था करावी अशी विनंती सुद्धा येथील महिला करत आहेत.सडलेल्या कचऱ्यापासून दुर्गंधी पसरत आहे. त्याच दुर्गंधी पासून लहान मुलांना, महिलांना,नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे,जर या त्रासापासून अनुसूचित प्रकार घडल्यास त्याला सर्वस्वी जबाबदार नगर परिषद राहील याची नोंद नगरपरिषद यांनी घ्यावी..

# सर्व सुविधांनीयुक्त जागतिक दर्जाचे ' कन्व्हेन्शन सेंटर' नागपुरात उभारावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य करार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू**
**संपादक नागपूर विभाग**

**मुंबई :** नागपुरात सर्व सोयी सुविधांनीयुक्त जागतिक दर्जाचे ' कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यात येणार आहे. याबाबत स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी नागपूरला उभारण्यात येणारे ' कन्व्हेन्शन सेंटर' ची निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जुळलेली असण्याची सूचना केली.

यावेळी भारतातील



राजदूत जुआन अँटेनियो, फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पायोनियर एक्झिबिशन अँड कॉन्व्हेन्शन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अरोरा आणि उपाध्यक्ष जीत अरोरा, नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपुरात प्रस्तावित असलेले कन्व्हेन्शन सेंटर केवळ प्रदर्शने, कार्यक्रम आदींसाठी उपयोगात येणारे नसावे, तर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी हक्काचे व्यासपीठ असावे. नागपूरचा इतिहास या ' कन्व्हेन्शन सेंटर' च्या माध्यमातून येथे आलेल्या प्रत्येकाला कळावा. अशा पद्धतीने कन्व्हेन्शन सेंटरची अंतर्गत रचना असावी. हे सेंटर अत्यंत आकर्षक, आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त आणि पर्यावरण पूरक वास्तूचे मूर्तिमंत उदाहरण ठरावे.

स्पेनचे राजदूत म्हणाले, भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ यांच्यात चांगले संबंध आहेत. यामुळे दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत होत आहे. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सामान्य नागरिकाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणत आहे. याची दखल जगाने घेतली आहे. मुंबई हे भारताचेच नव्हे, तर दक्षिण आशियाचे ' पावर हाऊस' बनत आहे. त्यामुळे मुंबई राजधानी असलेल्या महाराष्ट्रसोबत नक्कीच स्पेनला काम करायला आवडेल, अशा शब्दात त्यांनी महाराष्ट्राचा गौरव केला.

फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो यांनी सादरीकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी नागपूर आणि फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

# भटकंती करणाऱ्या वृद्धाला सामाजिक कार्यकर्त्यांनी वृद्धाश्रमात केले दाखल

**दैनिक युवक आधार**
**चिखली -वार्ताहर**

शहरातील बस स्थानक परिसरात भटकंती करून भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारे वृद्ध आजोबांची सामाजिक कार्यकर्त्यांनी दखल घेत त्या निराधार वृद्धाला मानवसेवा प्रकल्प अंतर्गत तुकाराम आश्रय वृद्धाश्रम, भोकर ता चिखली येथे केले दाखल.




सदर वृद्ध आजोबा हे अकोला जिल्ह्यातील असून ते भटकंती करत चिखली बस स्थानक परिसरात आढळून आले. तेव्हा सामाजिक कार्यकर्ते सुमेध जाधव यांनी आपुलकीने सर्व विचारपूस केली त्यांना दोन मुलं आहेत पण ते त्यांचा सांभाळ करत नाही हि किती शोकांतिका आहे. ज्या वडिलांच बोट धरून आपण हे जग पाहतो त्यांच्या नावाने ओळखले जातो म्हातारपणी आपण त्यांचा सहारा न बनता त्यांना भटकंती करण्यासाठी मजबूर करतो किती भयावह परिस्थिती आहे.

आजोबांच ऐकताच सुमेध जाधव यांनी माजी सरपंच भरत जोगदंडे, प्रहार चे धनंजय जटाळे, पुरुषोत्तम चिंचोले, गणेश श्रीवास्तव यांच्या सहकार्याने त्या निराधार आजोबांना तुकाराम आश्रय वृद्धाश्रमात प्रवेश मिळून दिला.

तसेच मानवसेवा प्रकल्प अंतर्गत कायम विनाअनुदानित तुकाराम आश्रय वृध्दाश्रम भोकर येथे वयोवृध्द आणि डिपेन्डंट व्यक्तींसाठी सर्व सोईसुविधा सह निवासी आश्रम गेल्या चार वर्षांपासून सुरु आहे. येथे गरजवंत निराधार आहेत अशा वयोवृध्द व चालते फिरते भिक्षा मागणारे आजोबा-आजी, डिपेन्डंट व्यक्ती इत्यादींसाठी सर्व प्रकरची निःस्वार्थ मोफत सेवा देणे सुरु आहे. तर कुठेही निराधार बेघर मुलं मुली व इतर नातेवाईक असून सुद्धा त्यांचा सांभाळत नसतील अश्या वृद्धानी 8855850378 या नंबर ला संपर्क करावा असे आवाहन वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांत डोंगरदिवे यांनी केले आहे.

## जागतिक टपाल दिनानिमित्त भूमी वर्ल्ड पार्क मध्ये पहिल्या टपाल कार्यालयाचे उद्घाटन

### भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्कने एक नवीन टप्पा गाठला

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर / मुंबई:** जागतिक टपाल दिनाचे औचित्य साधत 15 वर्षांचा वारसा असलेल्या भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्कने आपल्या कंपनीच्या परिसरात पहिल्या पोस्ट ऑफिसचे उद्घाटन करत एक महत्त्वाचा टप्पा गाठला. दळणवळण आणि लॉजिस्टिक्ससाठी ही नवीन सुविधा चालना देणारी आहे. यामुळे भूमी वर्ल्डमधील भरभराटीला येणाऱ्या औद्योगिक समुदायासाठी सोयीसुविधा आणखी वाढतील. मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) शाश्वत आणि एकात्मिक शहरी जागा विकसित करते आहे.श्री.अमिताभ सिंग, आय.पी.ओ.एस. हे प्रमुख पाहुणे, मुख्य पोस्टमास्टर जनरल-महाराष्ट्र सर्कल, म्हणून, तर नवी मुंबईच्या



पोस्टमास्टर जनरल श्रीमती सुचिता अनंत जोशी, आय.पी.ओ.एस. या सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. नवी मुंबई प्रदेशातील पोस्टल सेवा संचालक, श्री. अभिजित दिलीपराव इचके आय.पी.ओ.एस. यांनादेखील प्रतिष्ठित पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते.श्री.नानजी पटेल, प्रमुख-भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्क यांनी टपाल विभागाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले,"या टपाल कार्यालयामुळे पार्कमधील व्यवसायांसाठी कनेक्टिव्हिटी तसेच ऑपरेशनल सुलभता वाढवेल, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. आपल्या व्यावसायिक भागीदारांसाठी मजबूत पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या भूमी वर्ल्डची वचनबद्धता देखील यामुळे प्रतिबिंबित झाली."

# पिंपळगाव बसवंत नगरपरिषद निवडणूक सोडत अन्यायकारक

## फेर आरक्षण सोडतीचे निवडणूक आयोगाचे आदेश

**दैनिक: युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

पिंपळगाव बसवंत नगरपरिषद येथे नुकतीच पार पडलेली निवडणूक सोडत चुकीची व अन्यायकारक झाली असल्याने निवडणूक आयोगाने फेर निवडणूक सोडतिचे आदेश दिले आहे.

**याबाबत सविस्तर**

पिंपळगाव बसवंत येथील नगरपरिषद निवडणुकीसाठी काढण्यात आलेली सोडत चुकीची व अन्यायकारक असल्याने मा. ग्रामपंचायत सरपंच




भास्करराव बनकर यांनी हि बाब वरिष्ठांचे निदर्शनात आणून दिली. याबाबत मा. उपसरपंच विनायक खोडे व युवा नेते नितीन बनकर यांनी लेखी हरकत नोंदवली होती या तक्रारीची निवडणूक आयोगाने त्वरित दखल घेत तसे पत्र जारी केले आहे त्यात म्हटले आहे की पिंपळगाव बसवंत नगर परिषदेच्या आरक्षित जागा निश्चित करताना द्विसदस्यीय प्रभागांमध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिलांकरता आरक्षण निश्चित करताना चुका झाल्या असल्याने त्या तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्याकरिता नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिलांकरता नव्याने सोडत काढण्यासाठी निवडणूक आयोगाने पत्राद्वारे सुधारित आरक्षण सोडत पुढील प्रमाणे कार्यक्रम देण्यात आला आहे.

आरक्षण सोडत काढणे बाबत अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिलांसह आहे. तर रविवारी फेर आरक्षण सोडत काढण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे.

# पनवेल महापालिका क्षेत्रात सिडको प्राधिकरणाकडून दैनिक बाजार बांधकामाकरिता भूखंड उपलब्ध

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती अ (खारघर), व (कळंबोली), क (कामोठे), ड (पनवेल) मधील विविध भूखंडांवर दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सिडको प्राधिकरणाकडून दैनिक बाजार बांधकामाकरिता भूखंड उपलब्ध झाले आहे. बऱ्याच काळापासून या भूखंडांवर तात्पुरत्या बांधकामासह बाजारपेठा सुरु आहेत. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार, या ठिकाणी नव्याने कायमस्वरूपी बांधकाम करून दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित आहे. ज्यामुळे नागरिकांना बाजारांची चांगली सहजपणे व सोयिस्कर सुविधा उपलब्ध होणार आहे.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील खारघर प्रभाग अ मध्ये सेक्टर ३,४,६,११,१२,१५ व २० मधील एकूण १७ ठिकाणी गरजेनुसार विविध ओटे संख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आधिक मंजुरी देखील मिळाली आहे. काहीं दिवसांमध्ये काम पूर्ण होऊन नागरिकांच्या सेवेत प्रशस्त, रेखीव असे दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत. कळंबोली प्रभाग मध्य सेक्टर २, २६, ५, ६, १०, १२, १४, १५ मध्ये १६ ठिकाणी गरजेनुसार ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळाली आहे. पनवेलमध्ये फेरीवाल्यांची गणना झाली आहे.

मात्र अनेक फेरीवाल्यांकडे हक्काचा निवारा नसल्याने रस्त्यावर व्यवसाय करावा लागतो.

बाजारपेठांद्वारे त्यांना जागा उपलब्ध होणार आहेत.

## वर्चस्व ग्रुप भिगवण कडून सामाजिक बांधलिकी जपत केली पूरग्रस्तांना मदत

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील भिगवण येथील वर्चस्व ग्रुप भिगवण यांनी सामाजिक बांधलिकी जपण्यासाठी परंडा तालुक्यातील देवगाव येथील 50 कुटुंबानां पुरात नुकसान झाले असल्यामुळे शेतकरी बांधवांना किराणा सामानाचे किट व 50 महिलांना साड्या वाटप करून शेतकरी बांधवांना छोटीशी मदतीचा हात देण्यात आला.




त्यांच्या दुःखात सहभागी होऊन खऱ्या अर्थाने माणुसकीचे दर्शन घडविले आहे या ग्रुपच्या माध्यमातून एक सामाजिक कार्याचा आदर्श लोकांच्या डोळ्यासमोर ठेवला आणि ग्रुप मधील सहकाऱ्यांच्या मदतीने होईल तेवढी मदत जमा करून सामान्य पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना जीवन आवश्यक उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी कित्येक पूरग्रस्त शेतकरी बांधवांच्या मुखातून शब्द बाहेर पडले की जरी सरकारनी मदत केली नाही तरी आम्हाला आमच्या शेतकरी बांधवांनी आमच्या सारख्या पीडित पूरग्रस्त बांधवांना आधार देण्याचे बहुमोल काम केले आहे.

हे काम समाजासाठी आदर्श तर आहेच परंतु गरजेच्या वेळी केलेली मदत ही फार मोठी मदत झाली असून साक्षात परमेश्वराचे रूपच आम्हाला या ग्रुपच्या माध्यमातून पाहायला मिळाले असल्याची प्रतिक्रिया पूरग्रस्त शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे त्यांच्या या सामाजिक कार्याला आमच्याकडून शुभेच्छा व येथून पुढेही या वर्चस्व ग्रुपकडून त्यांचे कार्य गरिबांच्या मदतीला अखंडपणे चालू राहो अशी आम्ही आशा बाळगतो असा आशीर्वाद देऊन"पोटासाठी पसा पाहिजे,नको पिकाया पोळी" देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी म्हणून पीडित शेतकऱ्यांनी वर्चस्व ग्रुप भिगवणच्या दानशूर सभासदांना आशीर्वाद रुपी कौतुकाची थाप देण्यात आली या वाटपाचे नियोजन संस्थापक अध्यक्ष संतोष कुताळ उपाध्यक्ष अलताफ शेख कार्याध्यक्ष विशाल शिंदे सचिव राहुल भागडे संघटक कपिल लांडगे सरचिटणीस शशिकांत चव्हाण शेतकरी रमेशबुवा आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून ग्रुपचे सदस्य यांनी यासाठी मोलाचे सहकार्य केले असल्याची माहिती अध्यक्ष संतोष कुताळ यांनी सांगितले

# तांड्याचे सुपुत्र पोपट शिवाजी राठोड यांचा DMIHER मध्ये Ph.D. in Nursing साठी प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर वार्ताहर**

तांड्याचे सुपुत्र पोपट शिवाजी राठोड यांनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर Datta Meghe Institute of Higher Education and Research (DMIHER), वर्धा येथे Ph.D. in Nursing मध्ये प्रवेश मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



राठोड यांनी आपले प्राथमिक शिक्षण तांड्यावर तर उच्च शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथे पूर्ण केले. २०१८ मध्ये वडिलांचे छत्र हरवूनही त्यांनी शिक्षणाची वाट न सोडता संघर्ष करत शिक्षणाचा प्रवास सुरू ठेवला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करून त्यांनी हा टप्पा गाठला आहे.

या यशानंतर 'चेतक युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य' तर्फे राठोड यांना आर्थिक सहाय्याचे आश्वासन देण्यात आले असून, त्यामुळे त्यांच्या पुढील शिक्षणाला अधिक चालना मिळणार आहे.

तांड्यावर आणि परिसरात राठोड यांच्या या यशाचा भारी अभिमान व्यक्त केला जात असून, त्यांचा संघर्षमय प्रवास अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

## पनवेल पालिका करणार ६९० झाडांचे पुनर्रोपण; विकासकामात अडथळा ठरणाऱ्या झाडांना मिळणार 'जीवनदान'

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

कळंबोली सर्कल परिसरात उड्डाणपूल आणि सर्विस रोड चांयाकामाच्या कामात अडथळा ठरणाऱ्या तब्बल ६९० झाडांचे पुनर्रोपण पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे विकासकामास गती मिळणार असून, पर्यावरणाचे संतुलन अचापित राहील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मात्र, या झाडांची तोड होणार असल्याच्या चर्चेमुळे पर्यावरणप्रेमी नागरिकांत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पर्यावरणप्रेमी अरविंद म्हात्रे यांनी महापालिकेवर झाडे तोडण्याचा आरोप करत, कर झाडांना हात लावला गेला, तर न्यायालयात दाद मागू" असा इशारा



दिला आहे.

पनवेल महापालिकेच्या हरीतील कळंबोली सर्कल से खारघर, कल्याण-शिळफाटा आणि जे.एन.पी.टी. रोड या मार्गावर सर्विस रोड व उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या कामात अडथळा ठरणाऱ्या झाडांना लोड न करता अन्यत्र ठिकाणी पुनर्रोपण करण्यात येणार आहे. महापालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले की, "कळंबोली सर्कलपासून जव्हार इंडस्ट्रीपर्यंतच्या दुतर्फा मार्गावर पुनर्रोपणाच्या जागा निश्चित केल्या आहेत. येथे बांबूची आडे लावून हरितक्षेत्र चाढवले बाईल, पाणी व गैस पाईपलाईन असल्याने या ठिकाणी बांबू योग्य ठरेल.

सोशल मीडियावर झाडांच्या तोडीच्या नोटिसा बजावल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. कळंबोली परिसरातील काही नागरिकांनी व रिक्षाचालकांनी स्वतः झाडे लावून त्यांची काळजी घेतली आहे. पाच-सहा वर्षांत ती झाडे सावली देऊ लागल्याने स्थानिकांचा भावनिक संबंध या झाडांशी जोडला गेला आहे. 'महापालिकेने झाडे तोडू नयेत. जर लागवड करायचीच असेल, तर ती कासाडी नदी परिसरात करावी, झाडांवर कुठलाही घातक निर्णय घेतल्यास न्यायालयीन मार्गाचा अवलंब करू. असे अरविंद म्हात्रे यांनी म्हटले आहे.

# उरण तालुक्यातील मतदार याद्यांमध्ये घोळ ? निवडणुकीत पारदर्शकता राखण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. निवडणूक आयोगाने मतदार याद्या जाहीर करून हरकती घेण्याचे आवाहन केले, परंतु मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याचे राजकीय नेत्यांकडून सांगितले



जात आहे.

कोप्रोली गावातील ग्रामपंचायत मतदार यादीत तालुक्यातील इतर गावांचे मतदार समाविष्ट झाल्याची माहिती मिळाली आहे. तसेच खोपटे ग्रामपंचायतमध्ये 37 मतदार हे गावात वास्तव्य नसतानाही कोप्रोली यादीत समाविष्ट आहेत, असे ग्रामपंचायत सदस्यांनी स्पष्ट केले.

ग्रामपंचायतने या बाबत हरकत नोंदवली, तरी कोणतीही कारवाई किंवा नाव कमी करण्याची पावले नाहीत, असे ग्रामपंचायत सदस्य सांगतात.

उरण विधानसभा मतदारसंघातही अनेक परप्रांतीय मतदार उरणमध्ये वास्तव्यास आहेत, परंतु त्यांची नावे त्यांच्या मूळ गावाच्या यादीतही आहेत. या दोन्ही ठिकाणी नावे असल्यामुळे मतदारांना अनुचित फायदा मिळत आहे, असा आरोप स्थानिक राजकीय नेत्यांकडून करण्यात आला आहे.

राजकीय नेत्यांची मागणी आहे की, निवडणूक आयोगाने परप्रांतीय मतदारांची सखोल चौकशी करून त्यांची नावे योग्य मतदार संघात ठेवावी, जेणेकरून निवडणुकीत पारदर्शकता राखली जाईल.



# नळदुर्ग येथील महाविद्यालयात मुलांमुलींच्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : तांबड्या मातीत रांगडे खेळाडू तयार करणारा खेळ म्हणून कुस्ती या खेळाकडे पाहिले जाते. कालांतराने महाविद्यालय स्तरावर बदल होऊन मातीतील कुस्तीची जागा मॅटने घेतल्या मुळे महाविद्यालयीन स्तरावर देखील चांगले कुस्ती पटू तयार होत आहेत असे मत बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी व्यक्त केले.



नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि ११ ते १३ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नळदुर्ग येथील महाविद्यालयात मुलांमुलींच्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा विभागाच्या पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ विभागाचे क्रिडा संचालक डॉ. सचिन देशमुख, महाराष्ट्र राज्य ऑलंपिक संघटना उपाध्यक्ष डॉ चंद्रजित जाधव, शिवछत्रपती पुरस्कार विजेती कु गौरी शिंदे ,डॉ. सचिन सलामपुरे हे उपस्थित होते . या कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व प्रतिमा पुंजनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष राठोड कार्यालय अधिक्षक धनंजय पाटील, डॉ अशोक कदम, डॉ. शिवाजी घोडके , डॉ. हंसराज जाधव यांनी केले. याप्रसंगी पुढे बोलताना माजी मंत्री मधुकरराव चव्हाण म्हणाले कि , ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रतिवर्षी आम्ही विद्यापीठ स्तरावरील वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करत असतो यावेळी आम्ही मुलांमुलींच्या कुस्ती स्पर्धा घेण्याचे आयोजन केले यामागील प्रमुख उद्देश म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करणे हा आहे. अश्या स्पर्धेच्या माध्यमातूनच आमच्या महाविद्यालयात चांगल्या दर्जाचे खेळाडू तयार झाले व त्यांनी आमच्या महाविद्यालयाचे नाव राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध खेळांच्या माध्यमातून झळकावून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला.या कार्यक्रमास बालाघाट शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे, उपाध्यक्ष डॉ अभय शहापूरकर, संचालक बाबुराव चव्हाण, कोषाध्यक्ष अँड.प्रदिप मंटगे, सहसचिव शहबाज काझी, लिंबराज कोरेकर, जेष्ट कुस्ती पटू महादेवप्पा आलुरे , मैनोद्दीन शेख,नळदुर्ग येथील माजी नगरसेवक विनायक अहंकारी, नवाज काजी, सुधीर हजारे, इमाम शेख, सामाजिक कार्यकर्ते अझहर जहागिरदार, सौ सुभद्राताई मुळे, सौ कल्पना गायकवाड, शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर , शहर अध्यक्ष संतोष पुदाले , डॉ अंकुश कदम, प्रा. संभाजी भोसले प्राचार्य डॉ रामदास ढोकळे, प्राचार्य डॉ संजय कोरेकर, प्राचार्य डॉ मोहन बाबरे, पत्रकार विलास येडगे, सुहास येडगे, तानाजी जाधव , शिवाजी नाईक, सुनील बनसोडे, भगवंत सुरवसे,लतीफ शेख, उत्तम बनजगोळे, आयुब शेख, सतीश राठोड , दादा बनसोडे , शिवाजी वऱ्हाडे, अणदूरचे माजी सरपंच धनराज मुळे, प्रभाकर मुळे, शरणप्पा कबाडे, अमर नरवडे, सुंदर जवळगे, मार्तंड मोकाशे, दिपक घोडके,महादेव मुळे यांच्यासह

गावातील व परिसरातील कुस्तीचे जाणकार गावातील नागरीक व महाविद्यालयीन कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# सांगवी पाटणचे दोन अनमोल रत्न: महंत काशिनाथ महाराज आणि समाजसेवक समीर शेख

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**





आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण गावाने समाजसेवा आणि धार्मिक सद्भावाच्या क्षेत्रात दोन अनमोल रत्ने दिली आहेत. एक जिथे महंत भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांनी अध्यात्मिक क्षेत्रात आपली छाप सोडली, तिथे समीर शेख यांनी समाजसेवेद्वारे हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पाया रचला.

महंत काशिनाथ महाराज शास्त्री यांची २१ महंत म्हणून निवड झाली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह साजरा झाला. हुशार अभ्यासू असलेले काशिनाथ महाराज सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन घरोघरी अध्यात्मिक विचार पोहोचवतात. इतर महाराज भांडणे लावतात, तर काशिनाथ महाराज भांडणे मिटवून सर्वांना गुण्यागोविंदाने राहण्यास प्रोत्साहन देतात. "जात-धर्म मी मानत नाही. आपण या सृष्टीवर पाहुणे आहोत, मालक नाही," असे ते सांगतात.

दुसरे रत्न म्हणजे समाजसेवक समीर शेख. ते हिंदू-मुस्लिम सर्वधर्मसमभावासाठी नेहमी विविध उपक्रम राबवतात. शिवरायांचा मुस्लिम मावळा म्हणून महाराष्ट्रात ओळखल्या जाणाऱ्या समीर शेख यांनी शिवनेरीतून सांगवी पाटण पर्यंत पायी ज्योत आणली, काशीहून गंगाजल आणले, अखंड हरिनाम सप्ताहात भाग घेतला. अपघातग्रस्तांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, दवाखान्याचे काम अशा विविध समाजसेवेच्या कार्यातून त्यांनी सर्वधर्मीय भावना पोषलेल्या आहेत.

या दोन्ही व्यक्तींमुळे आष्टी तालुक्यात सध्या एकच चर्चा आहे - "सांगवी पाटण येथे दोन अनमोल रत्न आहेत!"

# गोंदेगाव–तीतूर रस्त्याची दुरवस्था; खड्डेमय रस्त्यामुळे जीवघेणा प्रवास

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील गोंदेगाव ते तितूर गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली असून, रस्त्यावर सर्वत्र पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना तारेवरची कसरत करत जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करावी,अशी गोंदेगाव येथील मा.उप सरपंच अनिल निकम व ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यां करतं आहे.



हनुमंतखेडा,उप्पलखेडा,धाप आणि तीतूर गावांना जोडणारा हा रस्ता गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून,अनेक ठिकाणी खोल खड्डे पडले आहेत.संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

या मार्गावरून गावातील नागरिकांना रोजच्या उद्योग, व्यवसाय, शाळा,नोकरी, रुग्णालय आणि महाविद्यालयीन शिक्षणासाठी गोंदेगाव बाजारपेठेत यावे लागते.खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना जीव मुठीत घेऊन जावे लागते.विशेषतः रात्रीच्या वेळी खड्डे लक्षात न आल्यामुळे वारंवार अपघात होत आहेत. केवळ तीन किलोमीटरच्या अंतरातच असंख्य खड्ड्यांमुळे वाहन चालवणे कठीण झाले आहे.

रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले काटेरी झुडपे अपघातास आमंत्रण देत आहेत.रस्ता वर्दळीचा असून दररोज हजारो वाहने येथे धावतात.दोन वाहने एकमेकांना ओलांडताना खड्ड्यांमुळे अडचण निर्माण होते. त्यामुळे नागरिक आणि वाहनचालकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी संबंधित विभाग तसेच लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. समाजसेवक व माजी उपसरपंच अनिल निकम यांनी केली आहे..

# विक्की बघेले यांची भाजप युवा मोर्चा जिल्हा महामंत्रीपदी नियुक्ती - गोंदियात उत्साहाचा जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी गोंदिया जिल्हा**

गोंदिया विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली आणि भाजप जिल्हाध्यक्ष सौ. सिताबाई राहागडाले यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीत नवचैतन्य फुंकणारी महत्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. विक्कीजी बघेले यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा जिल्हा महामंत्रीपदी नियुक्ती झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या नियुक्तीमुळे पक्ष संघटनेत नव्या उर्जेची लाट उसळली असून, युवा पिढीला पक्षकार्याची नवी दिशा मिळाली आहे. "विक्कीजी बघेले जिंदाबाद!", "युवा मोर्चा अभिमानाने पुढे चला!" अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी शहरात जल्लोष केला. ठिकठिकाणी आतषबाजी, फटाक्यांची रोषणाई, पुष्पगुच्छांनी सत्कार आणि शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.नियुक्तीनंतर भावना व्यक्त करताना विक्की बघेले म्हणाले,



“पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास मी कधीही तुटू देणार नाही. गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येक युवकाला सोबत घेऊन पक्षाची विचारधारा घराघरात पोहोचविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन.”या नियुक्तीबद्दल भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित अग्रवाल, जिल्हाध्यक्ष सौ. सिताबाई राहागडाले, तसेच विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विक्कीजी बघेले यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. गोंदियातील युवा नेतृत्वातून पुढे आलेल्या विक्की बघेले यांच्या निवडीमुळे भाजप युवा मोर्चाच्या कामकाजात नवी दिशा आणि गती येईल, अशी सर्वत्र भावना व्यक्त होत आहे. या नियुक्तीने गोंदिया जिल्हाभरात “युवा नेतृत्वाचा नवा अध्याय सुरू” झाल्याचे कार्यकर्त्यांमध्ये बोलले जात आहे.

# प्रा. बी.व्ही.मोतीपवळे यांचे जाहीर व्याख्यान



**दैनिक युवक आधार**

**लातूर प्रतिनिधी**

प्रतिनिधी महामाहीम मा. श्री शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दै.यशवंतचे मुख्य संपादक जेष्ट पत्रकार प्रा. बी.व्ही. मोतीपवळे सरांचे जाहीर व्याख्यान आयोजीत केले आहे.

लातूर येथील बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज येथे सकाळी दहा वाजता दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी लातूरचे सुपुत्र व देशाचे माजी गृहमंत्री आणि लोकसभेचे अध्यक्ष मा,श्री शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्याते प्रा. जेष्ट पत्रकार श्री. बी. व्ही मोतीपवळे हे मा.शिवराज पाटील चाकुरकर यांच्या आजपर्यंतच्या कार्यावर व्याख्यान होणार आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहान करण्यात आले आहे.

# दिव्यातील आगासन गणेश मंदिरातील दानपेटी फोडणारा चोर अखेर अटकेत

**दैनिक युवक आधार**

**अमित जाधव / ठाणे :**

दिवा शहरातील आगासन येथे ०३/१०/२०२५ रोजी पहाटे ५ ते ५:३० वाजेचे दरम्यान गणेश मंदिर आगासन रेल्वे फाटक दिवा पूर्व ता. जि. ठाणे येथील गणेश मंदिराच्या सभा मंडपातील स्लायडींगची खिडकी उघडुन खिडकीतुन आत प्रवेश करून मंदिराच्या गाभा-यातील गणेश मुर्तीच्या समोर ठेवलेल्या दानपेटी व त्यातील रोख रक्कम फिर्यादी देवेंद्र पाटील (वय 33) यांच्या संमतिशिवाय चोरून नेली म्हणुन मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रसंगी दिवा पोलिसांना तात्काळ सूत्र हलवत परिसरातील सिसिटीव्हीच्या माध्यमातून मोठ्या तांत्रिक कौशल्याने आरोपीस अटक करण्यात यश आले आहे. आरोपीला मोठ्या शिताफिने अटक करत तुरुंगात टाकले आहे. सदर आरोपीचे नावं सिद्धांत तांबोळी (वय ३१, राहणार दिवा ) असून अटकेच्या वेळेस आरोपिच्या अंगझडतीत काही मुद्देमाल देखील पोलिसांनी हस्तगत केला आहे. सदरची कामगिरी मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा पोलिसांनी केली असून मा. न्यायालयाने त्यास ऐक दिवसीय कस्टडी मंजूर केली असून पुढील तपास सुरु आहे. सदरच्या यशस्वी कारवाईमुळे आगासन ग्रामस्थ्य व दिवा वासीयांनी देखील दिवा पोलिसांचे कौतुक केले आहे.



# स्वामी भक्त धर्मेश गिरी यांच्यातर्फे श्री स्वामी समर्थ पादुका पूजन व दर्शन सोहळा संपन्न



**दैनिक युवक आधार**

**मुंबई(शांताराम गुडेकर)**

घाटकोपर विद्याविहार परिसरात सामाजिक कार्यात सक्रिय असलेले समाजसेवक व श्री स्वामी समर्थ भक्त धर्मेश भूपत गिरी यांच्या विद्याविहार येथील कार्यालयात वक्रतुंड औरंगाबादकर यांच्या सानिध्यात श्री स्वामी समर्थ पादुकांचे पूजन व दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. श्रीस्वामी समर्थ महाराज स्थापित दिव्य गुरुपरंपरा वैश्वानर अवतार परमसद्गुरू श्रीगजानन महाराजश्री यांच्या चिन्मय पादुकांचे पूजन व दर्शन सोहळा शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ४:३० वाजतापासून विद्याविहार पश्चिम प्रीमिअर रोड येथील सी-२, स्कायलाइन वेलस्पेस, गिरीराज ग्रुप येथे पार पडला.यावेळी श्री स्वामी समर्थ परमसद्गुरूंचे पादुकांचे पूजन व दर्शन सोहळ्याला श्री स्वामी भक्त, गिरी परिवार, मित्रमंडळी, पोलीस अधिकारी आदीसह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.याप्रसंगी श्री स्वामी समर्थ मूर्ती, पादुकांचे विधिवत अभिषेक पूजन, होम हवन, आरती करून प्रसाद वितरण करण्यात आले. शेवटी धर्मेश व भावेश भूपत गिरी यांनी श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे प्रदक्षिणा केली.


# पोलारीस लॉजिस्टिक पार्क भेंडखळ येथे कलमाच्या टायर खाली चिरडून ट्रकड्रायव्हरचा अपघात?

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी**

**प्रदीप पाटील**

दिनांक 9/10/2025 रोजी दुपारी 3 वाजण्याच्या च्या सुमारास पोलारीस सीएफएस भेंडखळ येथे कलमारच्या टायर खाली येऊन ट्रॅक ड्रायव्हर सैफुल्लाहा अमिरुल्लाहा खान वय वर्ष31,राहणार ग्राम नदवलीया अंतरी, सिद्धार्थनगर,जी. राज्य उत्तर प्रदेश याचा कलमारच्या मागच्या चकाखाली चिरडून जागीच मृत्यू झाला.



सैफुल्लाहा खान हा आपल्या ट्रॅकवरील काम संपवून कालमारच्या खाली उतरून उभा आसता कालमारचा चालक दुर्ग विजय कानोजिया राहणार जासई याने त्याच्या ताब्यातील कालमार 45 T क्र.H11601227 बेभानपणे रस्त्याच्या सभोतालच्या परिस्थिती कडे दुर्लक्ष करीत केवळ हलगर्जी पणाने व अविचाराने कालमार चालवून सैफुल्लाहा खान याला गाडीच्या मागच्या चाकाखाली चिरडले. या मध्ये सैफुल्लाहा खान याचा चिरडून जागीच मूत्यू झाला. या अपघातने पोलारीस सीएफएस मध्ये एकच खळबळ उडाली.असून येथील कामगारात हा घातपात की अपघात या बाबत चर्चेला उधाण आले आहे.

या संदर्भात पोलारीस अधिकृत सूत्रांकडून देण्यात आलेल्या माहिती नुसार, उरण पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद अपमृत्यू नोंद क्रमांक 279/2025 असून भा.द.वि. कलम 304 (अ) 279 अन्वये दिनांक 9/10/2025 रोजी 3 वाजता दाखल करण्यात आली आहे. या घटनेची खबर फिर्यादी रामानुजन रामखिलावन यांनी उरण पोलीस ठाण्यात दिली असता खबर मिळताच उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षण हनीफ मुलाणी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गोरे,सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय राठोड व गुन्हे प्रकटीकरण पथक बिटउरण पोलीस ठाणे व बीट मार्शल दोन वरील अंमलदार यांनी जातीने घटनास्थळी 4 ते 5.30 वाजण्याच्या दरम्यानभेट दिली.

या अपघाताचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गोरे हे अधिक तपास करीत आहेत.

# जिल्हा उपाध्यक्ष पदी दिलीप शेवाळे याची निवड

**दैनिक युवक आधार**

**शिवाजी पवार सेलू जिल्हा परभणी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) च्या जिल्हा उपाध्यक्ष पदी दिलीप शेवाळे यांची निवड करण्यात आली यावेळी नियुक्ती पत्र देताना मा. आ. विजय भांबळे मा. जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र काका लहाने, अँड बाळासाहेब रोडगे. पुरुषोत्तम पावडे, सौ निर्मला लीपने दिसत आहेत.या निवडीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी स्वागत केले आहे...!



# “नागावचा किनारा जागतिक नकाशावर; किनाऱ्याला आंतरराष्ट्रीय दर्जाचे ब्लू फ्लॅग प्रमाणपत्र”

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

“नागावचा किनारा झळकला जागतिक नकाशावर!”ब्लू फ्लॅग मानांकन प्राप्त; सरपंच हर्षदा मयेकर म्हणाल्या “ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा मानाचा मुकुट” रायगड जिल्ह्यातील नागाव या निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्याने आता जागतिक स्तरावर स्वतःची ओळख निर्माण केली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे ‘ब्लू फ्लॅग मानांकन’ प्राप्त करून नागाव किनाऱ्याने महाराष्ट्राचा मान उंचावला आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबतची माहिती देताना सांगितले की, नागाव व श्रीवर्धन या रायगड जिल्ह्यातील दोन किनाऱ्यांसह रत्नागिरीतील गुहागर व लाडघर, तसेच पालघरमधील पर्णका या किनाऱ्यांना देखील हे



मानांकन प्राप्त झाले आहे.‘ब्लू फ्लॅग’ हे जगातील अत्यंत प्रतिष्ठेचे पर्यावरणीय प्रमाणपत्र मानले जाते. डेन्मार्कमधील फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन या संस्थेमार्फत ३३ आंतरराष्ट्रीय निकषांच्या तपासणीनंतर हे मानांकन दिले जाते. स्वच्छता, जलगुणवत्ता, सुरक्षा, पर्यावरणपूरक व्यवस्थापन आणि पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा या घटकांची काटेकोर चाचणी करण्यात येते.या यादीत नागावचा किनारा समाविष्ट झाल्याने कोकणवासीयांचा अभिमान दुणावला आहे. हा समुद्रकिनारा आपल्या निळ्याशार पाण्याने, विस्तीर्ण पांढऱ्या वाळूतून चमकणाऱ्या लाटांनी आणि शांत, निसर्गाने नटलेल्या वातावरणाने पर्यटकांना भुरळ घालत असतो. गेल्या काही वर्षांत नागाव हा किनारा केवळ कोकणातील नव्हे तर देशभरातील पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ बनले आहे.

महत्वाची बाब म्हणजे महाराष्ट्र सरकारच्या वन विभाग आणि नागाव ग्रामपंचायत यांच्यात एक सामंजस्य करार झाला होता. या अंतर्गत जैवविविधता संवर्धन, सांडपाणी व्यवस्थापन, सुरक्षा आणि पर्यटन सुविधा विकास यावर विशेष भर देण्यात आला. ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच हे यश मिळाले, असे सांगून नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी समाधान व्यक्त केले. दुसरीकडे, श्रीवर्धन किनाऱ्याचाही विकास नगरपरिषदेच्या माध्यमातून करण्यात आला असून, निसर्ग चक्रीवादळानंतर या किनाऱ्याचे नव्याने सुशोभीकरण करण्याचे काम अदिती तटकरे यांनी पुढाकार घेऊन केले होते.

या मानांकनामुळे महाराष्ट्रातील किनारे जागतिक पर्यटन नकाशावर झळकतील, तसेच स्थानिक रोजगार आणि अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळेल, असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

नागाव किनाऱ्याच्या सौंदर्याला आता आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाल्याने कोकणातील पर्यटन नव्या उंचीवर पोहोचण्याची दाट शक्यता आहे. निळ्या समुद्राच्या लाटा, झुळझुळणारा वारा, नारळांच्या झाडांची रांग आणि स्वच्छ, शांत परिसर... या सर्वांमुळे नागाव हे केवळ गाव नाही, तर “कोकणचा मोती” ठरला आहे

“गावकऱ्यांच्या सहकार्याने आणि ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे नागाव किनाऱ्याला आज हा जागतिक दर्जाचा सन्मान मिळाला आहे. हे केवळ ग्रामपंचायतीचे नव्हे तर संपूर्ण रायगडवासीयांचे यश आहे,”

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती बद्दल पत्रकार उध्दवराव सरोदे यांच्या सत्कार



**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर / अर्धापूर -** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार उध्दवराव सरोदे यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा व पत्रकार संघाचे पदाधिकाऱ्यांचा नांदेड जिल्हा उत्तर व अर्धापूर भाजपाच्या वतीने भाजपाचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड.किशोरजी देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात त्यांच्या हस्ते व नगर पंचायत अर्धापूरचे नगराध्यक्ष प्र. प्रविण देशमुख यांच्या उपस्थितीत अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकार संघाचे तालुका तालुका पदाधिकारी बिभिषण कांबळे शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा सरचिटणीस परमेश्वर लालमे, अविनाश देशमुख चाभरेकर किर्तनकार,नितीन देशमुख,दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष आत्माराम राजेगोरे,नारायण बंडाळे,गजानन गवळी,गजानन वाघ,देविदास देवडे,गंगाप्रसाद वानोडे आदि उपस्थित होते.

# नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती आरक्षण – अधिकृत यादी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड प्रतिनिधी योगेश चौदंते**

ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या यादीत नांदेड जिल्ह्यातील एकूण 16 पंचायत समित्यांचे आरक्षण पुढीलप्रमाणे जाहीर झाले आहे:

तालुका सभापती पद आरक्षण
भोकर अनुसूचित जाती (महिला)
हिमायतनगर अनुसूचित जाती
किनवट अनुसूचित जाती
उमरी अनुसूचित जमाती
मुदखेड अनुसूचित जमाती (महिला)
नांदेड नागरिकांचा मागास प्रवर्ग
हदगाव नागरिकांचा मागास प्रवर्ग
नायगाव (खै.) नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
लोहा नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
देगलूर सर्वसाधारण (महिला)
मुखेड सर्वसाधारण (महिला)
बिलोली सर्वसाधारण (महिला)
धर्माबाद सर्वसाधारण (महिला)
कंधार सर्वसाधारण
अर्धापूर सर्वसाधारण
माहूर सर्वसाधारण

**मुदखेडमध्ये राजकीय समीकरणात उलथापालथ**

मुदखेड पंचायत समिती सभापती पदावर परंपरागतपणे विविध गट आणि पक्षांमध्ये सत्ता संघर्ष होत असतो. मात्र यंदा एस.टी. (महिला) आरक्षणामुळे राजकीय स्पर्धेचे चित्र बदलले आहे. मुदखेड तालुक्यात अनुसूचित जमाती घटकाची लक्षणीय लोकसंख्या असली तरी महिला नेतृत्वाचा अभाव जाणवत होता. यामुळे आता अनेक नव्या महिला नेत्या राजकारणात पदार्पण करणार की विद्यमान नेत्यांच्या घरातील महिला पुढे येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**स्थानिक पक्षांत जोरदार हालचाली सुरू**

आरक्षण जाहीर होताच शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), राष्ट्रवादी (टिळक गट), भाजप, काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी इतर स्थानिक पॅनल यांनी हालचाली सुरू केल्या आहेत. संभाव्य उमेदवारांच्या नावांची चर्चा सुरू झाली असून बहुजन आणि आदिवासी समाज संघटनांनीही या जागेवर "योग्य प्रतिनिधी" बसावा, अशी भूमिका घेतली आहे.नागरिकांची प्रतिक्रिया

स्थानिक पातळीवर आरक्षणाचे स्वागत केले जात असले तरी अनेकांनी हेही स्पष्ट केले आहे की फक्त महिला निवडून आल्याने चालणार नाही, तर खरा विकासाभिमुख आणि भ्रष्टाचारमुक्त नेतृत्व हवा. ग्रामपंचायती, जलसंधारण, पाणीपुरवठा, रस्ते, शाळा आणि रोजगाराच्या प्रश्नांवर काम करणारे नेतृत्व शोधण्याची मागणी होत आहे.

**पुढे काय?**

आता पुढील काही दिवसांत मुदखेड तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या बैठका सुरू होणार आहेत. एस.टी. (महिला) आरक्षणामुळे उमेदवार निवडीमध्ये पक्षांतर्गत संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर सरपंच संघटना, जिल्हा परिषद सदस्य आणि माजी सभापती यांचीही राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# एस. टी. प्रवाशांसाठी आनंदाची बातमी! नागपूर आगाराकडून 'खुशखबर' योजना जाहीर

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे प्रतिनिधी**

**नागपूर:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MS-RTC) नागपूर विभागाने प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी व त्यांना किफायतशीर दरात प्रवास सुविधा देण्यासाठी एक मोठी 'खुशखबर' योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत विविध पासच्या दरात लक्षणीय कपात करण्यात आली आहे. तसेच, नागपूर-पुणे मार्गावर गणेशपेठ आगारातून 'शिवशाही' बस सेवा सुरू करण्यात आली आहे.

किफायतशीर योजना (पास दर कपात):

दिनांक ०८.१०.२०२५ पासून एस. टी. महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ही 'खुशखबर' योजना लागू झाली आहे.

या योजनेत, ०४ दिवसीय पास व ०७ दिवसीय पास च्या मूळ किमतीत मोठी घट करण्यात आली आहे.

पासचा प्रकार बसचा प्रकार सुधारित दर




(आताचा) बचत
(जुना दर)

०४ दिवस प्रवास दर साधी बस ₹४३६४ ₹४५०
शिवशाही बस ₹१८९६ ₹१९५
१२ मीटर बस ₹२०७२ ₹१८९
०७ दिवस प्रवास दर साधी बस ₹४७४२ ₹७८१
शिवशाही बस ₹३४७५ ₹२१५४
१२ मीटर बस ₹३६९९ ₹३११४

या सुधारित दरांमुळे प्रवाशांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून, महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**नागपूर-पुणे 'शिवशाही' व 'साधारण' बस सेवा:**

नागपूर ते पुणे प्रवास करणाऱ्यांसाठी गणेशपेठ आगारातून विशेष सेवा सुरू करण्यात आली आहे.

सेवा: नागपूर-पुणे मार्गावर गणेशपेठ आगारातून 'शिवशाही' आणि 'साधारण' (साधी) अशा दोन्ही बसेस सोडण्यात येणार आहेत.

प्रारंभ: ही सेवा दिनांक १५.१०.२०२५ पासून ते दि. १५ ते १९.१०.२०२५ पर्यंत प्रायोगिक तत्त्वावर चालविण्यात येणार आहे.

आवाहन: एस. टी. प्रशासनाने सर्व प्रवाशांना या गाड्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**प्रवाशांसाठी आवाहन:**

एस. टी. महामंडळाने सर्व प्रवाशांना ०४ दिवसीय पास व ०७ दिवसीय पास च्या या 'खुशखबर' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. प्रवासी आणि विद्यार्थी वर्गासाठी ही दर कपात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# डॉ.जी.जी.पारिख यांची शोकसभा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

डॉ. जी जी पारिख यांची शोकसभा रविवार 12 ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वा. युसुफ मेहरअली सेंटरचे मधु-प्रमिला संकुल, बांधणवाडी ता.पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी सन १९६१ मध्ये युसूफ मेहरअली सेंटरची स्थापना करून मागील सात दशके अविरत सेवा करणारे, देशातील १३ राज्यांमध्ये सेंटरच्या शाखा निर्माण करून हजारो दीन-दुबळ्यांचे आधार बनलेले गांधीवादी स्वातंत्र्य सैनिक तथा ज्येष्ठ समाजसेवक डॉ.जी.जी. परिख यांचे दिनांक २ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वा. युसुफ मेहरअली सेंटरचे मधु-प्रमिला संकुल, बांधणवाडी ता.पनवेल येथे शोकसभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन युसुफ मेहरअली सेंटर विश्वस्त मंडळ, व्यवस्थापन समिती सदस्य व सर्व परिवार यांनी केली आहे.

# विंचूर परिसरातील द्राक्षबागा संकटात; द्राक्षबागेत घड न दिसल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर (ता. निफाड) :** निफाड तालुक्यातील विंचूर परिसरातील द्राक्षबागांवर निसर्गाचा मोठा कोप कोसळला आहे. सततच्या पावसामुळे द्राक्ष वेलींमध्ये ‘गर्भधारणा’ प्रक्रिया न झाल्याने बहुतेक बागांमध्ये घड तयार होताना दिसत नाहीत. त्यामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून विंचूर परिसरात अधूनमधून पडणारा पाऊस, ढगाळ वातावरण आणि आर्द्रतेचा अतिरेक यामुळे वेलींना आवश्यक सूर्यप्रकाश आणि पोषण मिळत नाही. द्राक्ष वेलींमध्ये गर्भधारणा न झाल्याने घड तयार होत नाहीत.

कृषी तज्ज्ञांच्या मते, “द्राक्ष वेलीसाठी गर्भधारणा आणि काडी परिपक्व होणे हे अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. सततचा पाऊस व दमट हवेमुळे ही प्रक्रिया बाधित होते आणि घड निर्माण होत नाही.”

अनेक शेतकऱ्यांनी सांगितले की, बागा हिरव्यागार दिसत



असल्या तरी वेलींवर घड नाही. त्यामुळे बाग ‘जगली’ असली तरी उत्पादन नाही – अशी स्थिती निर्माण झाली आहे.

मजुरी, खतं, औषधं आणि पाणीपुरवठा यांचा खर्च वाढला आहे. परंतु उत्पादन जवळपास शून्यावर आल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांना बँक कर्जफेडीची चिंता सतावत आहे.

या गंभीर परिस्थितीवर कृषी विभागाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी शेतकरी व संघटनांकडून केली जात आहे.

तज्ज्ञ पथकांनी प्रत्यक्ष पाहणी करून उपाययोजना सुचवाव्यात आणि शासनाने विशेष मदत जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कृषी विभागाने हवामानाशी सुसंगत तंत्रज्ञान, रोग नियंत्रणासाठी औषधांची योग्य माहिती व अनुदान देणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

हवामान विभागाने पुढील काही दिवसांमध्ये पुन्हा पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. जर हवामान स्थिर झाले नाही, तर पुढील हंगामातील उत्पादनावर देखील परिणाम होऊ शकतो.

सध्या विंचूर परिसरातील द्राक्षबागांमध्ये चिंतेचे वातावरण असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर नैराश्याचे सावट दिसत आहे. वर्षभराचा खर्च, मेहनत आणि अपेक्षा – या सगळ्यावर हवामानाने पाणी फिरवल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत.

# जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त सीकेटी कॉलेजमध्ये इमोशन फ्रेंडली कॅम्पस डे साजरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्,कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त) अर्थात सीकेटी कॉलेजमध्ये युवा मानसरंग क्लबच्या वतीने जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'इमोशन फ्रेंडली कॅम्पस डे' हा कार्यक्रम पार पडला.

प्रो. सोनाली हुद्दार यांनी ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम प्रकारे करत मुख्य प्रवक्ते प्रो. डॉ. बी.एस.पाटील व समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांच्या स्वागताने सुरुवात झाली. मानसरंग संवादक, पूर्वा, संस्कृती, समिक्षा, सृष्टी यांनी पुढील जबाबदारी पार पडली. या सत्राची सुरवात डॉ.बी. एस.पाटील यांनी ‘भावना आणि मानवी वर्तन’ या विषयाने केली. यामध्ये स्वतःला ओळखायला शिकणे का महत्वाचे आहे.




तसेच आपण भावनांचे नियंत्रण कसे करायचे हे उदाहरणांद्वारे सांगितले. तसेच मनाची क्षमता हि अगाध आहे आणि त्याला कसे ओळखायचे हे प्रात्याक्षिके घेऊन पटवून दिले. यंदाचे जागतिक मानसिक आरोग्याची थीम ‘आपत्ती आणि आपत्कालीन परिस्थितीत मानसिक आरोग्य सेवांमध्ये प्रवेश ‘हे असून, मुलांना आपत्कालीन परिस्थितीत तुम्ही सेवांचा वापर करणे का गरजेचे आहे कारण प्रत्येक कठीण परिस्थिती ला एक चंदेरी झालर असतेच आणि ती शोधण्यासाठी समुपदेशक आणि मानसरंग संवादक हे एमएसएफडीए आणि परिवर्तन ट्रस्ट द्वारे प्रशिक्षित युवा मानसरंग क्लब ह्या फोरम द्वारे मदत करण्यास तयार असतात हा संदेश मुलांपर्यंत पोहोचवला. कार्यक्रम झाल्यावर एक ऑनलाईन व्यक्तिमत्व चाचणी सुद्धा घेण्यात आली. त्याचा रिपोर्ट लगेचच विद्यार्थ्यांच्या ईमेल आईडी वर पाठवण्यात आला, जेणेकरून त्याची गुप्तता पाळली जाईल. या कार्यक्रमासाठी प्रो.डॉ.भाग्यश्री भोईर, प्रज्योती देसाई, प्रो. सोनाली हुद्दार, प्रो. दीपश्री राठोड, व १८७ विद्यार्थी, यांनी सहभाग घेतला होता.


# महिला खेळाडूंसाठी चेंजिंग रूमची सुविधा – मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

## क्रीडा संकुल, स्पोर्ट्स क्लब, जिमखाना, स्टेडियम व क्रीडांगणांवर सुविधा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्यातील महिला खेळाडूंसाठी शासनाने अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व क्रीडा संकुल, स्पोर्ट्स क्लब, जिमखाना, स्टेडियम तसेच स्थानिक क्रीडांगणांवर स्वतंत्र, स्वच्छ आणि सुरक्षा-सुसज्ज चेंजिंग रूमची सुविधा महिला खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी काही दिवसांपूर्वी दादर जिमखानाच्या नूतनीकरण उदघाटनप्रसंगी महिलांना क्रीडांगणावर सुरक्षित व आदरयुक्त वातावरण मिळालेच पाहिजे, त्यासाठी देशभरातील क्रीडा संकुलात महिलांना चेंजिंग रुमची



सुविधा उपलब्ध करून देण्याबद्दल आवाहन केले होते.

या आवाहनाला तत्काळ व सकारात्मक प्रतिसाद देणारे ॲड. माणिकराव कोकाटे हे देशातील पहिले मंत्री ठरले आहेत.

क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे यांनी सांगितले की, राज्यभरातील महिला खेळाडूंना सुरक्षित आणि सन्मानजनक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना तातडीने राबवली जाणार आहे. प्रत्येक जिल्हा, तालुका आणि स्थानिक क्रीडांगणावर या सुविधा प्राधान्याने उभारल्या जातील.

चेंजिंग रूममध्ये स्वच्छतागृह, आरोग्य सुविधा आणि आवश्यक सुरक्षिततेसाठी मर्यादित क्षेत्रात सीसीटीव्ही देखरेख ठेवली जाणार आहे. तसेच प्रत्येक ठिकाणी महिला सुरक्षा कर्मचारी नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जुनी इमारत दुरुस्त करणे अथवा नवीन चेंजिंग रूम बांधण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे केवळ सुविधा उपलब्ध होणार नाहीत, तर महिलांचा सहभाग आणि विश्वास क्रीडा क्षेत्रात वाढीस लागेल.

मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, क्रीडा क्षेत्रातील प्रत्येक मुलगी आता अभिमानाने मैदानात उतरेल. तिच्या प्रत्येक यशामागे सुरक्षित आणि सन्मानित वातावरणाचा मजबूत पाया असेल. या निर्णयामुळे राज्यातील महिला खेळाडूंसाठी एक नवा अध्याय सुरू होणार असून, महाराष्ट्र महिला सक्षमीकरणाच्या दिशेने आणखी एक पुढचा टप्पा पार करत आहे.

# करंजाडे ग्रामपंचायतीची वडघर पूल ते कॉलेज फाटा रस्त्यावर अतिक्रमणावर कारवाई करून वाहतूक कोंडी फोडली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

पनवेल जवळील वडघर पूल ते कॉलेज फाटा पर्यंत वाढलेल्या अतिक्रमणावर कारवाई करत करंजाडे ग्रामपंचायतीने वाहतूक कोंडी फोडली आहे. सरपंच मंगेश शेलार यांनी याबाबत पुढाकार घेवून नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा दिला आहे.

पनवेलहून उरणकडे जाताना गाढी नदीवर पूल बांधण्यात आला आहे.त्या पुलापासून कॉलेज फाटा पर्यंत हातगाडी आणि फेरीवाल्यांनी रस्ता अतिक्रमित केला होता.त्यामुळे पादचारी आणि वाहनचालकांना येता-जाता नाहक त्रास सहन करावा लागत होता.या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी देखील होत होती. नागरिकांनी याबाबत ग्रामपंचायत करंजाडे यांना तक्रारी केल्या होत्या.यावर सरपंच मंगेश शेलार यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना यावर कारवाई करण्याचे आदेश दिले.तेव्हा आठ कर्मचारी यांनी एक जेसीबी सह अतिक्रमणावर कारवाई केली.त्यामुळे या मार्गाने आज मोकळा श्वास घेतला.याबाबत नागरिकांकडून सरपंच मंगेश शेलार आणि ग्रामपंचायतीचे आभार मानले जात आहेत.



# एक पाऊल समाज परिवर्तनाकडे....

## महेंद्र भदाने व भीमराव भदाणे यांचा समाजाकडून आणि मित्र ग्रुप विरार कडून सत्कार समारंभ आयोजन

**दैनिक युवक आधार**
**विरार मुंबई योगेश साबळे**

कार्यक्रमाचे मुख्य विषय म्हणजे एक पाऊल समाज परिवर्तनाकडे अखिल भारतीय लोणी मराठा समाज संघटना विरार मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार समारंभाचे मुख्य आयोजक क्लासमेट ग्रुप आणि मित्रपरिवार तसेच युवा खानदेश मित्र मंडळ विरार पूर्व व खानदेश गणेश मित्र मंडळ विरार पश्चिम यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित केला होता तसेच कार्यक्रमात उपस्थित असलेले सर्व विरार शहरातील आणि मुंबईतील समाज बांधव उपस्थित होते

आपल्या समाजातील समाजसेवक श्री महेंद्र श्रीराम भदाणे व भाऊसाहेब जगन्नाथ भदाणे यांनी समाजाला नवी दिशा देण्याचे धोरण तयार केले आहे तसेच समाज कार्य म्हणजे काय व समाजकार्य कसे करावे याचे उत्तम उदाहरण यांनी त्यांच्या कर्तृत्वातून



दाखवून दिलेला आहे शिरदाने गावातील अत्यंत महत्त्वाचे व सर्व लोकांच्या गरजेची ती म्हणजे समशानभूमी त्या ठिकाणी त्यांनी ठिबक सिंचन केले आहे तसेच लोकांच्या सोयीसाठी त्या ठिकाणी झाड लावली आहेत शिवजयंतीच्या निमित्ताने 51 झाडे लावण्याची संकल्पना त्यांनी मांडली त्यांच्या उपस्थितीत तेथे झाडे लावण्यात आली .तसेच तिथे पाण्याचे टाके देखील बांधली गेली आहे तिथल्या लोकांची सोय व्हावी व 13 7 2017 रोजी शिरदाने गावातील कै. रघुनाथ चैत्राम भदाणे यांच्या स्मणार्थ 100 वृक्षांची लागवड करण्यात आली .त्यावेळी गावातील सर्व युवा मंडळ व समाजसेवक हजर होते. आणि हे सर्व करून त्यांनी माघार न घेता तिथे स्वखर्चाने तिथे झाडांची देखरेख करण्याकरिता एक माणूस सुद्धा ठेवला आहे. जेणेकरून तिथे कचरा होऊ नये सर्व ठिकाणी स्वच्छ रहावी व तिथल्या झाडांना पाणी मिळावं ही सर्व सोय त्यांनी केली तसेच मृतदेहासाठी तिथे विसावा बांधला तसेच श्री महेंद्र भदाने यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने इतर वायफळ खर्च न करता समाजाची सेवा व्हावी म्हणून त्यांनी जिल्हा परिषद मराठी शाळेला व गुलाबवाडी मधील लहान मुलांसाठी जेवणाचा डब्बा पेन्सिल रबर व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे न्यू इंग्लिश स्कूल शिरधाणे इयत्ता पाचवी इयत्ता आठवी पर्यंत लॉग बुक आणि पेन व इतर साहित्यांचे वाटप केले त्यामुळे त्यांच्या त्या सेवेतून तसेच मदतीतून नवीन तरुण पिढींना असा आदर्श घ्यावा असे महेंद्र भदाणे आणि भीमराव भदाणे यांनी आवाहन केले आहे . आज यांचे समाज कार्य पाहता विरार मधील समाज बांधवांनी त्यांनी पोट भरून कौतुक केलं आणि त्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन केले समाजाच्या माध्यमातून आणि क्लासमेट च्या ग्रुपच्या माध्यमातून त्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला अध्यक्ष बाळू पाटील व उपाध्यक्ष शिवाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम पार पडला.

# जनता दरबारात नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ निर्णय — अंधेरी गोंदवलीत प्रशासनाचा संवाद उपक्रम

## K/पूर्व विभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; आशीष जी साहेबांच्या उपस्थितीत विविध नागरी समस्यांवर चर्चा

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या K/पूर्व विभागात (अंधेरी गोंदवली परिसरात) आज शासनाच्या 'जनता दरबार' उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. विविध नागरी समस्या, विकासाच्या मागण्या आणि स्थानिक पातळीवरील प्रश्न मांडण्यासाठी परिसरातील अनेक नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.

या दरम्यान नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी व तत्काळ निर्णय घेण्यासाठी आशीष जी साहेब उपस्थित होते. त्यांच्या सोबत विभागाचे वरिष्ठ अधिकारी, सहाय्यक आयुक्त तसेच विविध शाखांचे अधिकारी उपस्थित होते. नागरिकांना आपल्या समस्या थेट प्रशासनापुढे मांडता याव्यात आणि त्यावर तात्काळ निर्णय व्हावा, या उद्देशाने हा जनता दरबार घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अधिकारी वर्गाने विभागातील प्रलंबित कामांचा आणि सुरू असलेल्या विकास योजनांचा आढावा घेतला. नागरिकांनी पाणीपुरवठा, नालेसफाई, कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची दुरुस्ती, स्ट्रीटलाइट्स, अनधिकृत बांधकामे, वाहतूक कोंडी तसेच



आरोग्यविषयक अडचणी यांसारख्या अनेक समस्या मांडल्या. काही नागरिकांनी सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, शाळांची देखभाल आणि उद्यानांच्या दुरुस्तीबाबतही मागण्या केल्या.

प्रत्येक तक्रारीवर संबंधित अधिकाऱ्यांनी जागेवरच स्पष्टीकरण दिले आणि शक्य त्या ठिकाणी तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. आशीष जी साहेबांनी नागरिकांच्या भावना समजून घेत, "जनतेच्या प्रत्येक अडचणीला उत्तर देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. शासन जनतेच्या दारात पोहोचवण्याचा प्रयत्न 'जनता दरबार' उपक्रमातून होत आहे," असे सांगितले. त्यांनी नागरिकांकडून मिळालेल्या सर्व मागण्यांची नोंद घेऊन तातडीने कृती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

या दरम्यान काही तक्रारींचे निराकरण तत्काळ करण्यात आले तर काही प्रकरणांत पुढील आठवड्यात समाधानकारक उत्तर देण्याचे आश्वासन देण्यात आले. विभागातील विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, स्थानिक नगरसेवक, महिला मंडळे आणि नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले.

कार्यक्रमाची सांगता "जनतेच्या सेवेतूनच प्रशासन मजबूत होते, आणि लोकांचा विश्वास हीच खरी शक्ती आहे" या विचारांनी करण्यात आली.

# माजी आमदार विजय भांबळे यांनी घेतली संवाद बैठक



**दैनिक युवक आधार**
**शिवाजी पवार सेलू जिल्हा परभणी**

आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषांने माजी आमदार विजय भांबळे यांनी कार्यकर्ता संवाद बैठक आयोजित केली होती.

या वेळी प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना माजी आमदार विजय भांबळे पुढे होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकतीने लढण्याचा निर्धार व्यक्त केला..

यावेळी सूत्रसंचालन परवेझ सौदागर यांनी केले प्रास्ताविक सुधाकर रोकडे, राजेंद्र काका लहाने, अप्पासाहेब डख, बालाजी हरकळ रामेश्वर गाडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले...

# ज्येष्ठ लेप्रोस्कोपिक सर्जन श्री.नितीन शहा यांचे " पद्म" पुरस्कारसाठी नामांकन दाखल

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

व्हिजन इंडिया समूह द्वारा डॉ.नितीन शहा यांचा यावर्षीच्या "पद्म" पुरस्कारसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यात आला.२६ हजाराहून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात अविरत कार्य करण्यारे ज्येष्ठ लेप्रोस्कोपिक सर्जन श्री.नितीन शहा यांचा व्हिजन इंडिया समूह द्वारे यावर्षीच्या पद्म पुरस्कारसाठी नामांकन दाखल करण्यात आले.

भारत गणतंत्र प्रधानमंत्री यांच्या अध्यक्षतेत मंत्रीमंडळ द्वारे सूचित व्यक्तीविशेषांचा महामहीम राष्ट्रपती यांच्या द्वारे पद्म अलंकरणाने विशेष सन्मान केला जातो.यासाठी दूरस्थ माध्यमाद्वारे नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी सरकार द्वारा आवाहन करण्यात आले होते.श्रीमती सायली सावंत यांच्या शिफारशीनुसार संस्था सल्लागार ज्येष्ठ समाजसेवक मंगेश रासम यांच्या परिश्रमातून डॉ.नितीन शहा यांचे




नामांकन दाखल करण्यात आले.याचे औचित्य साधत संस्था संस्थापक अध्यक्ष स्वप्निल राणि नंदकुमार यांनी डॉ नितीन शहा यांचा विशेष सन्मान करत,डॉ नितीन शहा यांचे सातत्यपूर्ण वैद्यकीय योगदान तसेच परिश्रम उचित माध्यमांद्वारे समाजासमोर आले पाहिजे असे प्रतिपादन या समारंभ प्रसंगी व्यक्त केले.श्रीमती रासम, श्री.सुनील सावंत,श्री जिग्नेश शहा यावेळेस विशेष उपस्थित होते.

# वाचनातून घडते प्रगल्भ व्यक्तिमत्व : प्रा डी टी आंबेगावे

## जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**तळा वार्ताहर**

भारताचे माजी राष्ट्रपती व महान वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर रोजी देशभर 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयात परीक्षा सुरू असल्यामुळे वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम ११ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. डी. टी. आंबेगावे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. जी. भवरे होते. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. एस. के. ढवण यांनी करून दिली. प्रमुख वक्ते प्रा. आंबेगावे




यांनी आपल्या भाषणात वाचनाचे वैयक्तिक व शैक्षणिक जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. "वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती वाढते, प्रगल्भ व्यक्तिमत्व घडते, वाचन म्हणजे व्यक्तिमत्व विकासाचा पाया आणि करिअर घडविण्यास मदत होते त्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे साहित्य, विज्ञान, इतिहास व प्रेरणादायी पुस्तकांचे वाचन करावे," असे आवाहन करून विविध उदाहरणांद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा दिली. आभार श्री प्रशांत वेदक यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरेदीला जातांना............!

खरचं आपल्याला खुप आनंद होत आहे कारण भूतकाळातील इतिहासापेक्षा भविष्यकाळाची स्वप्न मला अधिक आवडते कारण यषस्वी होण्याचा सर्वात खात्रीदायक मार्ग म्हणजे जीवनात सकारात्मकेता अवलंब करून समाजातील लोकांना आनंद मिळुन देणे होय. आता लवकरच दिवाळी, संक्रांत व इतर सणासुदीचे दिवस असल्यामुळे पूर्ण भारत देशात आनंदमय दिवस येत असल्याचे जाणवते. या निमित्याने आपण सर्व सण मोठया आनंदान उडया मारत मारत साजरा करतो आणि खुप भरमसाठ खरेदी करण्यासाठी घरातुन बाहेर निघतो. हे सगळयांचे होते. माझे पण होत आहे. पण सणासुदीच्या दिवसात खरेदीला जातांना काही महत्वाची खबरदारी वेळीच घेतलेली बरी राहील असे मला कटाक्षाने म्हणावे लागेल, कारण पैसा वर्तमानात फार महत्वाची बाब होवुन बसली आहे. पैषाचा पाऊस म्हणजे आनंदाची परवणीच म्हणावी लागेल.

किंबहुना आपण आयुष्यातील सामान्य गोष्टी असामान्य मार्गाने करतो तेव्हाच जगाचे लक्ष आपल्याकडे वेढले जातात. आपण पैषाचे महत्व महत्वाचे समजुन जाणले पाहीजे. या देषात लवकरच सरकारी / निमसरकारी व इतर नोकरी करणाÚया अधिकाÚयांना तसेच कर्मचाÚयांना भरघोश दिवाळीची सप्रेम भेट म्हणून बोनस रूपाने सरकार कडून बोनस रूपाने येत्या दिवसात मिळणार आहे हे निष्चितच आणि खरेदी पण भरपूर होणार आहे. पा एकदा खिषातुन पैसा निघुन गेल्यावर खर्च झालेल्या पैषाचा पष्चाताप होवु नये म्हणुन पैषाचे महत्व ओघाने जाणले पाहीजे असे मला वाटते. त्याकरीता येत्या दिवसात आपण आनंदमय सोहळा / दिवाळी सण व इतर सण



साजरा करण्यासाठी पैषे जास्त खर्च होवु नये याकरीता आपण, परिवार तसेच घरातील वृध्द म्हातारे आई वडिल समवेत इतर लहानग्या मुलानी पैषाचे महत्व समजुन खर्च आटोक्यात ठेवणे भविश्यकाळासाठी परवणीच बाब म्हणावी लागेल. त्याकरीता खालील बाबीवर लक्षपुर्वक लक्ष देणे महत्वाचे आहे. असे मी रास्तपणाने म्हणुया ?

1) सणासुदीच्या दिवसात मार्केटमध्ये आपल्याला प्रलोभनार्थ टाकेल असेच दुकान सजलेले असते हे आपल्याला मान्य करावे लागेल. याकरीता योग्य सामानाची यादी घरूनच बनविणे अगत्याचे आहे. जे सामान आपल्याला लागत आहे तेच आपण कृपया नमुद करावे जेणेकरून जास्तीचे सामान आणता कामा नये.

2) दुकानात प्रवेष केल्यानंतर दुकानदाराला आपण सामानाची यादी कृपया नाव लिहुन सुपुर्द करावी. जर आपल्याला सामानाचे नाव आठवत असेल तर कृपया आणखी लिहावे जेणेकरून सुचीच्या बाहेर सामान घेतल्यास आपला खर्च वाढण्याची शक्यता राहते. जे सामान आपल्याला आवष्यकच आहे तेच घ्यावे जेणेकरून आपला हिषोब आटोक्यात राहील. हे केल्यास आपला पैसा काही क्षणासाठी आपल्याजवळ राहील कारण दिवाळी झाल्यानंतर लगेच सर्दी पदसे व इतर किरकोळ आजारासाठी आपल्याजवळ खिषात पैसे असणे आवष्यक आहे.

3) आपल्याला या दिवसात सरकारकडून/ कार्यालयाकडून बोनस रूपाने जास्तीचा पैसा खर्च भेटवस्तु म्हणून आपल्याला मिळालेला असतो म्हणून की काय ? उथळ पैषाला खळखळात फार असतो जसे आपण खिषात हजार रूपये असेल तर आपण 700 ते 800 रूपयाचे फाटाके व इतर वस्तु घेण्यासाठी झटतो पण या दिवसात बोनस रूपाने 15 ते 20 हजार रूपये मिळाल्यास खिषा पॉकेट गरम असल्याचे जाणवते म्हणून की काय रूपये 800 ऐवजी आपण फटाके 2000 ते 3000 हजाराचे घेतो ही बाब आपल्या भविष्याकरिता दयनिय म्हणावे लागेल. यावर आपण प्रष्न उपस्थित कराल कि दिवाळीच आहे म्हणून खर्च करावे नाही काय? हाच विचार आपल्याला स्वतःचा विकास खंडीत पडायला भाग पाडतो हे मात्र खरे यावर वर्तमानात तंत्र आधुनिक तंत्रज्ञानाच्या देषात कटाक्षाने महत्वाचे समजुन अत्यंत जाणिवपुर्वक गंभीरपणे पैषासचा जपवणुकीकडे लक्ष देण्याची मानवी समाजाला गरज आहे, असे नाही वाटत काय ?

4) आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात लोकांना प्रलोभन दाखविण्यासाठी मोठ मोठे मॉल, डि मॅट व इतर मोठ मोठी दुकान सजवुन निर्माण करतात कारण कोणताही व्यक्ती सजावट पाहुन दुकानात येईल पण आपण इथेच चुकतोच कारण जिवन म्हणजे स्वतः षोध घेणे नव्हे, तर जिवन म्हणजे स्वतः ला चांगल्या रितीने घडविणे होय कारण आमच्या परिस्थितीत आपल्याला गरज नसलेली वस्तु मोठ मोठया मॉल, डि मॅट व इतर प्रलोभने दाखवुन अनेक वस्तु कारण नसतांना आपल्या स्वतःच्या घरात येतात. त्यामुळे आपला हिषोब बिघडतो हे आपल्या सर्वांना जाणले पाहीजे.

यादी नसतांना आपल्याकडे गरज नसतांना वस्तु घरात येतात त्यामुळे त्या वस्तुचा उपयोग देखल होत नाही. कालांतराने ती वस्तु काही दिवसात आपोआप उकीडयावर दिसते. हि आपल्यासाठी षोकांतिका नाही काय? यासाठी पैशाचे महत्व जाणुन खरेदीला जातांना वेळीच खबरदारी घेतली पाहीजे असे मला वाटते.

आजच्या काळात पैषाला वारे माफ महत्व प्राप्त झाले आहे. पैसा वाचविण्याची बचत करण्याची इच्छा असेल तर कारण मी प्रारंभिक लक्ष देणे व इच्छा षक्ती प्रबळ असेल तर व आत्मविष्वास ही अषी षक्ती आहे की, जी तुम्हाला पायथ्यावरून यशाच्या शिखरावर पोहचू शकते. त्याकरिता खरेदीला जातांना पैषाची कषी बचत होईल याचा विचार करणे वर्तमानात गरजेचे आहे. आपल्याला आदर्षापर्यंत जाण्यासाठी पैषाची बचत करणे यासारखे आपल्याला टोकाचे प्रयत्न करावे लागतील तरच आपल्याकडे पैसा बचतीकडे, काटकसरीकडे वेळीच लक्ष देणे व खरेदीला जातांनी परिवारातील सदस्याला सुची तयार करतांना हजर ठेवणे महत्वाचे आहे तरच भविश्यात बचतीच्या माध्यमातुन स्वतः चा विकास षक्य होईल.

हे आर्टीकल आपण वाचल्यानंतर पुर्ण महाराश्ट्रात जे व्यक्ती वाचतील त्यांचा पैसा फुल नाही फुलाची पाकळी समजुन बचत होईल महाराश्ट्रात प्रत्येक परिवाराचे 1000 ते 2000 रूपये बचत केल्यानंतरच लिहीनाÚयाला सुध्दा एक प्रकारचा आनंद होईल असे म्हणणे सर्वानुमते रास्त ठरवे. या समवेत आपल्या सगळयांना दिवाळीच्या आपल्या परिवाराला माझ्याकडून खुप खुप शुभेच्छा!

भविश्यात बचत, काटकसरच आपल्याला भरपुर आनंद देवुन स्वप्नपुर्ती करू शकते असे म्हणणे रास्त ठरावे.

**- विजय सरस्वती सिताराम सोनारघरे,**
**लेखक/वृत्तपत्र समिक्षक**



# भारतामध्ये जातीवाद आजही जिवंत आहे?

अलीकडे म्हणजेच ६ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर न्यायालयाच्या आवारात एका व्यक्तीने बूट फेकल्याची घटना घडली. ही घटना केवळ न्यायालयाच्या प्रतिष्ठेवरचा आघात नाही, तर ती भारतीय समाजाच्या खोलवर रुजलेल्या एका अदृश्य पण जिवंत वास्तवाची म्हणजेच जातीवादाच्या अजूनही न संपलेल्या प्रवृत्तीची तीव्र जाणीव करून देते. ज्या न्यायसंस्थेचा कारभार समता, न्याय आणि संविधानाच्या मूल्यांवर आधारित आहे, त्याच संस्थेच्या सर्वोच्च पदावर असलेल्या एका अनुसूचित जातीतील न्यायमूर्तीवर हल्ला होतो, हे केवळ व्यक्तीवरील आक्रमण नसून, तो आपल्या सामाजिक मनोवृत्तीतील असहिष्णुतेचा आणि जातीद्वेषाचा प्रत्यक्ष पुरावा आहे. भारतामध्ये जातीवाद कायद्याने संपला असे आपण मानतो. पण प्रत्यक्षात तो समाजाच्या प्रत्येक थरात, प्रत्येक क्षेत्रात आणि प्रत्येक मनोवृत्तीत विविध स्वरूपात जिवंत आहे. ज्या समाजाने हजारो वर्षे एका गटाला 'उच्च' आणि दुसऱ्याला 'नीच' ठरवून सामाजिक व आर्थिक अन्यायाची रचना निर्माण केली, त्या समाजाचे मानसिक पुनर्निर्माण केवळ संविधानाच्या कलमांमुळे शक्य होणार नाही, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच सांगितले होते. "जात हा फक्त सामाजिक अन्यायाचा प्रश्न नाही, तो मनुष्याच्या आत्म्याच्या गुलामीचा प्रश्न आहे," असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानाचा अर्थ आजच्या काळातही तितकाच लागू पडतो.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ एका व्यक्तीविरुद्धचा रोष नसून, तो त्या व्यक्तीच्या सामाजिक ओळखीवर आधारित द्वेषातून प्रेरित आहे. ज्यांना न्यायमूर्तींच्या निर्णयांशी असहमती आहे, त्यांनी आपले मत कायदेशीर मार्गाने मांडण्याऐवजी हिंसेचा मार्ग स्वीकारला, याचा अर्थ लोकशाहीच्या मूल्यांवरील विश्वास कमी होत चालला आहे. पण याहून धोकादायक गोष्ट म्हणजे, या घटनेला काही लोकांनी धैर्याचे कृत्य म्हणून गौरवले. यामागे असलेली विचारसरणी ही त्या जातीय अभिमानातून आणि अपमानातून निर्माण झालेली आहे, जी अजूनही आपल्या समाजाच्या रक्तात मिसळलेली आहे. भारताचे संविधान समानतेचा पाया रचते, पण समाजातील विचारसरणी आजही विषमतेवर उभी आहे. डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट चेतावणी दिली होती की "राजकीय समानता आणि सामाजिक असमानता या दोन्ही एकत्र राहू शकत नाहीत. जर सामाजिक विषमता संपवली नाही, तर राजकीय स्वातंत्र्य टिकणार नाही." आजच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर या वाक्याचे भयंकर वास्तव दिसते. सर्वोच्च न्यायालयातील एका दलित सरन्यायाधीशावर हल्ला होणे म्हणजे केवळ संविधानिक मूल्यांचा अपमान नाही, तर तो भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवासावर प्रश्नचिन्ह आहे.

भारतीय समाजात जातीवादाचा आविष्कार फक्त खेड्यापाड्यांतील अस्पृश्यतेपुरता मर्यादित नाही. तो आजच्या शहरांमध्ये, शिक्षणसंस्थांमध्ये, नोकरीत, राजकारणात आणि अगदी न्यायसंस्थेतही काही प्रमाणात शिरला आहे. सामाजिक माध्यमांवर, वृत्तवाहिन्यांवर, राजकीय सभांमध्ये जेव्हा एखाद्या विशिष्ट जातीतील व्यक्तीबद्दल द्वेषयुक्त भाषा वापरली जाते, तेव्हा ते केवळ अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नसते तर ते सामाजिक मानसिकतेचे उघड दर्शन असते. आजही भारतात 'कोणाचा जन्म कुठे झाला' हे अनेकदा 'तो किती समर्थ आहे' यापेक्षा जास्त महत्त्वाचे मानले जाते. यालाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जातीय गुलामी' असे संबोधले होते. जात हा केवळ सामाजिक विभाग नाही, तो एक मानसिक चौकट आहे. ही चौकट माणसाला माणसाशी समानतेने वागू देत नाही. म्हणूनच आंबेडकर म्हणतात की "जात हा सामाजिक विषाचा कप आहे." त्यांनी समाजाला या विषातून मुक्त करण्यासाठी शिक्षण, संघटना आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा आग्रह धरला. पण दुर्दैवाने, आजही भारतीय समाजाच्या मोठ्या भागात शिक्षण असूनही विचारात समानतेचा प्रकाश पोहोचलेला नाही. डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले संविधान केवळ राजकीय दस्तऐवज नाही, तर ते सामाजिक क्रांतीचे साधन आहे. परंतु, जेव्हा समाज त्या मूल्यांना आत्मसात करत नाही, तेव्हा अशा घटना घडतात.

जातीय असमानतेचे बीज इतके खोलवर पेरले गेले आहे की, ते सामाजिक प्रतिष्ठेच्या प्रत्येक स्तरात अंकुरलेले आहे. सर्वोच्च न्यायालयात, संसदेत, प्रशासकीय सेवेतील पदांवर दलित व मागासवर्गीय प्रतिनिधित्व वाढले असले तरी, त्यांच्या निर्णयांना आणि व्यक्तिमत्त्वांना अनेकदा "कोटा जज", "रिझर्व्हर्ड ऑफिसर" अशा शब्दांनी कमी लेखले जाते. ही मानसिकता हाच खरा जातीयवाद आहे. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले, विशेषतः दलित अत्याचार प्रकरणे, आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या संदर्भातील अनेक खटले त्यांनी निपटवले तरी त्यांच्या जातीच्या आधारावर त्यांना लक्ष्य करणे म्हणजे संविधानाच्या आत्म्यावरच वार करणे होय.

या घटनेनंतर अनेक सामाजिक संस्थांनी, बुद्धिजीवींनी आणि विधी क्षेत्रातील तज्ञांनी चिंता व्यक्त केली की, हा प्रकार देशाच्या न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी करू शकतो. कारण न्यायालय हे ते ठिकाण आहे, जिथे दुर्बलांचा आवाज ऐकला जातो, आणि अन्यायावर न्याय दिला जातो. जर त्या संस्थेतील प्रमुख व्यक्तीवरच सामाजिक पूर्वग्रहातून हल्ला झाला, तर तो लोकशाहीच्या आत्म्याला हादरा देतो. समाजशास्त्रज्ञ एम.एन. श्रीनिवास यांनी 'प्रभावी जात सिद्धांत/संकल्पना' मांडताना म्हटले होते की, ज्या जातींना सामाजिक व आर्थिक सत्ता प्राप्त आहे, त्या जातींना इतरांच्या उन्नतीचा धोका वाटतो आणि त्या प्रतिकाराच्या रूपात हिंसक वर्तन करतात. हा सिद्धांत या घटनेवर अचूक लागू पडतो. माध्यमांमध्येही या घटनेबद्दल दुहेरी दृष्टिकोन दिसून आला. काही वृत्तवाहिन्यांनी या घटनेला "कोर्टरूम अनागोंदी" म्हणून दाखवले, तर काहींनी "दलित सरन्यायाधीशांवर हल्ला" असे हेडलाईन दिले. या शब्दांमधील फरक केवळ भाषेचा नाही, तर दृष्टीकोनाचा आहे. एकीकडे न्यायालयीन शिस्तभंगाचे चित्र उभे केले जाते, तर दुसरीकडे जातीवर आधारित सामाजिक हिंसेचा संदेश दडपला जातो. यामुळे वाचक आणि नागरिक यांच्यात वास्तवाची विकृत समज निर्माण होते. माध्यमांची जबाबदारी फक्त बातमी देण्यापुरती नाही, तर समाजातील असमानतेला ओळखून तिच्या विरोधात जनमत घडवण्याची आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "संविधान कितीही चांगले असले तरी, ते चालवणारे जर चांगले नसतील तर ते निष्फळ ठरेल." आज आपण त्या अवस्थेत आहोत, जिथे कायदे, कलमे आणि धोरणे समतेसाठी तयार आहेत, पण मनुष्याचे मन अजूनही जुन्या विषमतेने भारलेले आहे. शिक्षित समाजातही जात हे अजूनही विवाह, निवडणुका, नियुक्त्या आणि सामाजिक संबंध यांच्यावर परिणाम करते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जातीचे उच्चाटन' या ग्रंथात स्पष्टपणे म्हटले आहे की "जात नष्ट केल्याशिवाय खरा लोकशाही समाज निर्माण होऊ शकत नाही." या घटनेतून समाजासाठी एक गंभीर संदेश दडलेला आहे. आपण अजूनही त्या मानसिक गुलामगिरीतून पूर्ण मुक्त झालो नाही. संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराचा अर्थ केवळ कागदावर टिकवून ठेवणे नव्हे, तर तो आचरणात आणणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या समाजाचे स्वप्न पाहिले, त्या समाजात कोणत्याही व्यक्तीचा सन्मान किंवा अपमान त्याच्या जातीवर अवलंबून नसावा. आज जर सर्वोच्च न्यायालयातील एक दलित सरन्यायाधीश स्वतः जातीय द्वेषाचा बळी ठरू शकतो, तर सामान्य माणसाची स्थिती आपण ओळखू शकतो. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक व सामाजिक संस्थांनी जातीय भेदभावविरोधी शिक्षणावर भर देणे अत्यावश्यक आहे. फक्त कायदे करून किंवा आरक्षण देऊन जातीय विषमता संपणार नाही, जोपर्यंत सामाजिक दृष्टिकोन बदलत नाही. संविधानाचा आत्मा म्हणजे समता, बंधुता आणि स्वातंत्र्य होय. या तिन्ही मूल्यांना जोपासण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बंधुता' या संकल्पनेवर विशेष भर दिला, कारण त्यांच्या मते बंधुता हीच सामाजिक एकतेची गुरुकिल्ली आहे. पण आज समाज धर्म, जात, भाषा आणि प्रांत यांच्या आधारावर तुटत चालला आहे. या सर्वांच्या पलीकडे जाऊन आपण विचार केला पाहिजे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिलेले संविधान केवळ शासन करण्याचे साधन नाही, तर ते सामाजिक नवजागृतीचे घोषणापत्र आहे. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्यासारख्या घटना या नवजागृतीच्या मार्गातील आव्हाने आहेत. त्या आपल्याला विचार करायला भाग पाडतात की, आपण खरंच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपतो आहोत का, की फक्त त्यांच्या प्रतिमांवर पुष्पहार अर्पण करून समाजात विषमता टिकवतो आहोत?

जातीयतेविरुद्ध संघर्ष हा केवळ दलितांचा नव्हे, तर संपूर्ण मानवतेचा संघर्ष आहे. कारण जात हा केवळ एका समूहाचा प्रश्न नाही, तर तो समाजाच्या मानवी संवेदनेवरचा आघात आहे. जोपर्यंत आपण जातीच्या ओळखीपलीकडे जाऊन माणसाला माणूस म्हणून स्वीकारत नाही, तोपर्यंत भारताचा सामाजिक विकास अपूर्ण राहील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते की भारत म्हणजे "घटनात्मक नैतिकते" वर उभा असलेला समाज होय. म्हणजेच कायद्यापेक्षा नीतिमूल्यांना महत्त्व देणारा समाज होय. त्या दृष्टीने पाहता, ६ ऑक्टोबर २०२५ रोजीची घटना ही केवळ न्यायालयातील असभ्य कृती नाही, तर ती संविधानिक नीतिमत्तेवरच प्रश्नचिन्ह आहे. म्हणून या घटनेतून शिकण्यासारखे म्हणजे, जातीवाद हा फक्त सामाजिक अवशेष नाही, तर तो आजही सक्रिय आणि धोकादायक वास्तव आहे. आणि जोपर्यंत आपण त्याचा सामना शिक्षण, संवेदना आणि कायद्याच्या माध्यमातून करत नाही, तोपर्यंत तो पुन्हा पुन्हा नव्या रूपात समोर येत राहील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "मनुष्याच्या विचारात क्रांती घडविणे हेच खरे परिवर्तन होय." ही विचारक्रांती प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजली, तरच आपण खरंच म्हणू शकतो की "भारतामध्ये जातीवाद आता इतिहास झाला." पण सध्याच्या वास्तवात मात्र भारतात जातीवाद अजूनही जिवंत आहे आणि त्याच्याशी झुंज देणे ही प्रत्येक संवेदनशील नागरिकाची जबाबदारी आहे.

**ॲड. सुनिल बगाटे व डॉ. राजेंद्र बगाटे**



## आंबेडकरवादी मिशनतर्फे ओबीसी शिक्षणक्रांती परिषद भव्यदिव्य – विद्यार्थ्यांमध्ये उर्जा, नवचैतन्य!

**दैनिक युवक आधार**
**योगेश चौदंते**

ओबीसी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीस नवी दिशा देण्यासाठी आणि स्पर्धा परीक्षांमध्ये ओबीसी तरुणांनी आत्मविश्वासाने पुढे यावे यासाठी नांदेडच्या आंबेडकरवादी मिशनतर्फे ओबीसी शिक्षणक्रांती परिषद भव्यदिव्यपणे संपन्न झाली. शैक्षणिक प्रबोधनाचा दीप प्रज्वलित करण्याच्या ध्येयाने आयोजित केलेल्या या परिषदेला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजातील मान्यवर यांची मोठी उपस्थिती लाभली.

ही परिषद आंबेडकरवादी मिशनचे सर्वेसर्वा आदरणीय दीपक कदम यांच्या पुढाकाराने मिशन परिसरात आयोजित करण्यात आली होती. सामाजिक न्याय, शिक्षणाधिकार आणि ओबीसींच्या शैक्षणिक हक्कांसाठी सातत्याने काम करणाऱ्या या मिशनच्या या उपक्रमाचे जिल्ह्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

**मान्यवरांच्या उपस्थितीने वाढला सोहळ्याचा मान**

या परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. मेघना कावली उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाचे महत्त्व अधिक वृद्धिंगत झाले. तसेच शिक्षण क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्त्वे माजी शिक्षण संचालक मा. गोविंद नांदेड, महाराष्ट्राचे माजी दुसरे शिक्षण संचालक मा. नंदन नागरे सर, प्रा. आर. डी. शिंदे सर, मा. एस. जी. माचनवार, मा. गोविंदराम सुरनर यांनी परिषदेचे मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शन करणारे अशोक कुबडे यांनी ओबीसी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत स्पर्धा परीक्षा, UPSC, MPSC तसेच इतर शासकीय भरती परीक्षांची सखोल माहिती दिली. स्पर्धा परीक्षेतील यशाचे सूत्र "संयम, समर्पण आणि सातत्यपूर्ण अभ्यास" असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**शिक्षणक्रांतीचा ध्यास – ओबीसी समाजाच्या प्रगतीची हाक**

परिषदेत "ओबीसीची शैक्षणिक वाटचाल आणि आरक्षणाचा शैक्षणिक प्रगतितील महत्त्वाचा वाटा" या विषयावर विस्तृत चर्चा झाली. वक्त्यांनी शिक्षणावर भक्कम पायाभरणी केल्याशिवाय सामाजिक परिवर्तन शक्य नसल्याचे स्पष्ट मत मांडले.

परिषदेच्या माध्यमातून खालील महत्त्वाचे संदेश देण्यात आले:

ओबीसी विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे

शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत मार्गदर्शन पोहोचविण्याचा संकल्प

शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक उन्नती साधण्याचा निर्धार

ओबीसी विद्यार्थ्यांसाठी विशेष अभ्यास वर्ग, वाचनालये आणि मार्गदर्शन शिबिरे उभारण्याचे आवाहन

**दीपक कदम यांच्या कार्याचे उपस्थितांकडून कौतुक**

या परिषदेचे निमंत्रण देत असताना आंबेडकरवादी मिशनचे दीपक कदम यांनी ओबीसी समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणच एकमेव प्रभावी अस्त्र असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या सामाजिक जाणिवा, संघटनशक्ती आणि मार्गदर्शी नेतृत्वाचे सर्वमान्य पाहुण्यांनी कौतुक केले.

मार्गदर्शन सत्रानंतर अशोक कुबडे यांनी दीपक कदम आणि आंबेडकरवादी मिशनच्या संपूर्ण कार्यकर्त्यांचे विशेष आभार मानले. त्यांनी सांगितले की, "ही परिषद माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. अशा उपक्रमांनी समाज जागृत होतो आणि नवे परिवर्तन घडविण्याची प्रेरणा मिळते."

ही परिषद म्हणजे केवळ कार्यक्रम नसून ओबीसी समाजाच्या शैक्षणिक क्रांतीचा प्रारंभबिंदू असल्याचे उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणादायी वातावरणात पार पडले तर शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ॲड.डॉ.सत्यपाल कातकर यांनी अ.भा. आदिवासी विकास परिषदेचे आंदोलनात सामिल कार्यकर्त्यांना मिळवून दिला जामीन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**चंद्रपूर -** राजूरा येथे दिनांक २७/०९/२०२५ ला पाच ते सहा हजार आदिवासी बांधवांनी आरक्षण बचाव मोर्चा काढला सदर मोर्चाचे आयोजन आरक्षण बचाव समिती राजूरा तर्फे बंजारा,धनगर व गैरआदिवासी जातीला अनु.जमाती संवर्गामध्ये समावेश करू नये याकरीता मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते.

त्यामध्ये काही समाज बांधवांना पोलीस कार्यवाहीस सामोरे जावे लागले व ही बातमी काही वृतपत्रात नागपूर मुख्य पृष्ठावर दिनांक २८.०९.२०२५ ला दगडफेक व आंदोलकांवर सौम्य लाठीमार या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाली व ह्यांचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटले ह्यामुळे सर्वप्रथम पाच व इतर ८ ते ११ असा एफआयआर ४६७/२०२५ अन्वये पोलीस स्टेशन राजुरा मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला.पहिले पाच कार्यकर्त्यांवर कलम १८९(१), १९१(१), १९१(२), १९०, १३२, १२१(१), १२१(२), १२६(२), ११८(२) व २२३ अन्वये गुन्हा नोंद करून पाच कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले व राजुरा दिवाणी व फौजदारी न्यायालयात हजर करण्यात आले तर न्यायाधीश दिवाणी व फौजदारी न्यायालय,राजुरा ह्यांनी जामीन नाकारुन पोलीस कस्टडी निश्चित केली तर पुढे दुसऱ्या तारखेला न्यायालय कस्टडीत रवानगी झाली व पुढे अतिरिक्त सत्र न्यायालय चंद्रपूर येथे सुद्धा त्यांचा जामीन नाकरण्यात आला.पोलिसांनी पुन्हा दिनांक ०७. १०.२०२५ ला श्रीराम परचाके, सुरेश आडे व सुनिल कुमरे ह्यांना सदर आरोपात ताब्यात घेतले व दिनांक ०८.१०.२०२५ ला पुढील कार्यवाहीसाठी राजुरा न्यायालयात हजर केले.मात्र मागील आरोपीत कार्यकर्त्यांचा न्यायाधीश,दिवाणी व फौजदारी न्यायालय राजुरा व अतिरिक्त सत्र न्यायालय, चंद्रपूर येथे जामीन नाकारल्यामुळे ह्यावेळेस अ.भा. आदिवासी परिषदेचे विदर्भ महासचिव ॲड.मधुकर कोटनाके व अ.भा.आदिवासी परिषदचे विदर्भ युवामहासचिव श्री महीपाल मडावी ह्यांचे समोर आरोपीत कार्यकर्त्यांना जमानत मिळवून देण्याचे फार मोठे आव्हान होते म्हणून त्यांनी वकील बदल करून प्रसिद्ध मनोवैज्ञानिक तथा संविधानतज्ञ ॲड.डॉ.सत्यपाल कातकर ह्यांचे वर जामीन जिम्मेदारी सोपविली. सन्माननीय विद्यमान न्यायाधीश एस.एच.बेलेसरे,

जुडीशल मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लास,दिवाणी व फौजदारी न्यायालय,राजुरा येथे आरोपीत तीनही कार्यकर्त्यांना पुढील कार्यवाहीस्तव दाखल करण्यात आहे ह्यात सरकारी अधिवक्ताने सर्वप्रथम जामीन देण्यास लिखित विरोध नोंदविला तर आरोपीची बाजू राजुरा न्यायालयात मांडताना ॲड.डॉ.सत्यपाल कातकर ह्यांनी दिनांक ०८.१०. २०२५ ला भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ (१) (क)१९ (१)( ख) अनुसार आदिवासी आरक्षण बचाव आंदोलन कसे कायदेशीर योग्य आहे.

अनुच्छेद २१ मध्ये उल्लेखित व्यक्तिगत अधिकार संदर्भात मुद्देसूद युक्तिवाद केला तसेच महाराष्ट्रामध्ये जरांगे पाटील ह्यांचे आंदोलनाचा गैरफायदा घेऊन बंजारा समाज हैद्राबाद गॅजेट नुसार कसा बेकायदेशीर संविधानिक अनुसचित जमाती आरक्षणात समाविष्ट करण्याचा बेकायदेशीर प्रयत्न करीत आहे आणि आदिवासिंच्या आरक्षणावर कसा बेकायदेशीर घाला घालीत आहे व ह्यांचा विरोध करण्यासाठी आदिवासी समाज पुढे येऊ नये काय? ह्यांवर मुद्देसूद युक्तिवाद केला व पोलिसांनी दाखल केलेला एफआयआर कसा आदिवासीचे व्यक्तिगत अधिकार व मौलिक अधिकार पायमल्ली करीत आहे

मोर्चाला हिंसक वळण देऊन पोलिसांनी केलेले बेजबाबदारपणे



दाखल केलेली कलमे कसे बेकायदेशीर आहेत व तिन्ही आरोपी कसे बेकसूर आहेत व मोर्चा कसा दिनांक २६.०९.२०२५ अन्वये दिलेल्या परवानगीचे निकष तंतोतंत पालन करून ठरविलेल्या ठिकाणापासून तहसील कार्यालयात शांततेने पोहचला व कुठलेही हिंसक कृत्य केले नाही ह्यांची मुद्देसूद बाजू मांडणी केली ह्यात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना जामीन देणे कसे कायदेशीर आहे आणि ह्यावर मा.विद्यमान न्यायाधीश ह्यांनी अनेक युक्तिवादातील मुद्द्यावर केलेल्या प्रतिप्रश्न व त्या प्रत्येक प्रश्नाचे विवेचन संयम न डळु देता कायदेशीर केलेली मांडणी विचारात घेऊन विद्यमान न्यायाधीश, दिवाणी व फौजदारी न्यायालय,राजुरा ह्यांनी तिन्ही कार्यकर्त्यांचा जामीन मंजूर केला, ह्यात त्यांचे सहाय्यक म्हणून ॲड.मधुकर कोटनाके ह्यांनी महत्वपूर्ण भूमिका वटविली.सदर युक्तिवाद ऐकण्यासाठी अनुसूचित जमातीचे पुढारी श्री जंगू पाटील येडमे, सोनापूर,श्री विजय उपरे,कमलदास नगरकर व अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.तब्बल अर्धा तास ॲड.डॉ. सत्यपाल कातकर ह्यांनी कायदेशीर युक्तिवाद केला. विशेष म्हणजे ते आज अनुसूचित जाती व जमातीच्या ऍट्रॉसिटी संदर्भात दाखल केसेस व इतर केसेस उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे तर इतर मागासवर्गीय सामान्य जनतेच्या तसेच पिडीत स्त्रियांच्या केसेस सामाजिक दायित्व म्हणून न्यायालयात बहुतांश विनामूल्य लढतात

ही त्यांच्या मोठेपणाची साक्ष होय.

डॉ.सत्यपाल कातकर यांनी न्यायालयात विवेकपूर्ण व कायदेशीर बाजू मांडून दिनांक ०८/१०/२०२५ ला श्रीराम परचाके चिंचाळा,सुरेश आडे,जामणी व सुनिल कुमरे ह्यांना जामीन मिळवून दिला त्यात आदिवासी विकास परिषदेचे विदर्भ युवा सचिव श्री.महिपाल मडावी,व विदर्भ महासचिव ॲड. मधुकर कोटनाके यांनीही महत्वपूर्ण भूमिका निभावून सामाजिक कर्तव्य निभावले आहे व त्यांच्या तत्परतेमुळे न्यायालयातून जामीन मिळाली असल्याने राजूरा तालूका अध्यक्ष मनोज आत्राम, सचिव दिपक मडावी, मुर्लीधर मेश्राम,मधुकर टेकाम, बाळकृष्ण मसराम या सह दशरथजी कुडमेथे, संतोष कुडमेथे यांनी युक्तिवाद कायदेशीर मांडणी करणारे प्रसिद्ध मनोवैज्ञानिक डॉ.सत्यपाल कातकर, अधिवक्ता,उच्च न्यायालय व सहाय्यक भूमिका निभावणारे अ.भा.आदिवासी परिषदेचे विदर्भ महासचिव ॲड.डॉ.मधुकर कोटनाके व अ.भा.विदर्भ परिषदेचे युवा महासचिव श्री महीपाल मडावी यांचे अभिनंदन कार्यकर्त्यानीं केले आहे

## खारघर वाहतूक शाखेकडून प्रवाशांसाठी प्रबोधन - सुरक्षित प्रवासासाठी उपयुक्त मार्गदर्शन



### महिला प्रवाशांना वाहन क्रमांक जतन करण्याचे, तर चालकांना वाहतूक नियम पाळण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**

**खारघर :** खारघर वाहतूक शाखेच्या वतीने वाहतुकीचे नियम पाळणे तसेच प्रवास करताना महिला आणि पुरुष प्रवाशांनी घ्यावयाची काळजी याबाबत प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रबोधन सत्रात महिला प्रवाशांना सुरक्षित प्रवासासाठी उपयुक्त सूचना देण्यात आल्या. प्रवासादरम्यान रिक्षा किंवा बसचा वाहन क्रमांक लिहून ठेवणे अथवा मोबाईलमध्ये फोटो काढून घरच्यांना, मित्रांना किंवा नातेवाईकांना पाठवणे यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळण्यास सुलभता राहील, असे सांगण्यात आले.

तसेच वाहनचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, वाहनाचे कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, गणवेश परिधान करणे, मद्यप्राशन करून वाहन न चालवणे आणि परवाना जवळ ठेवणे या बाबींचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन . PSI शिदोरे पो.हवा/169 मांढरे यांनी केले. प्रबोधन सत्र खारघर वाहतूक शाखेसमोरील बस स्टॉप येथे सायंकाळी 7 ते 7.20 वाजेपर्यंत पार पडले.

कार्यक्रमास 15 ते 20 वाहनचालक तसेच महिला व पुरुष प्रवासी उपस्थित होते.